७० वर्ष

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. १६ मार्च २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## ५ राज्यातील विधानसभा निवडणुकांची तारीख जाहीर



नवी दिल्ली (दै. संध्या) : महाराष्ट्रातील निवडणुकांचा गुलाल उधळून झाल्यानंतर आता पुढील तीन वर्षे राज्यात कुठल्याही मोठ्या निवडणुकांची बिगुल वाजणार नाही. मात्र, देशातील 5 राज्यात विधानसभा निवडणुकांचं रणशिंग फुंकलं जात असून केंद्रीय निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत निवडणुकांची घोषणा केली. देशाचं लक्ष लागलेल्या पश्चिम बंगालसह तामिळनाडू आसाम, पुद्दुचेरी आणि केरल राज्यात निवडणुका होत आहेत. केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली. विशेष म्हणजे या 5 राज्यांच्या निवडणुकांसह महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी मतदारसंघातील पोटनिवडणुकांचीही तारीख जाहीर करण्यात आलीय. त्यानुसार, प. बंगालमध्ये दोन टप्प्यात निवडणुका होत असून 23 आणि 29 एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यात मतदान

मुंबई (दै. संध्या) : निवडणूक आयोगाने आसाम, केरळ, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालच्या विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. तामिळनाडूमध्ये 23 एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होईल. बंगालमध्ये 23 आणि 29 एप्रिल रोजी दोन टप्प्यात मतदान होईल. केरळ, आसाम आणि पुद्दुचेरी या तीन राज्यांमध्ये 9 एप्रिल रोजी एकाच टप्प्यात मतदान होईल. पाचही राज्यांचे निकाल 4 मे रोजी जाहीर होतील. यासह, या राज्यांमध्ये आचारसंहिता लागू झाली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी सांगितले की पाचही राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये 17.4 कोटी मतदार आणि 824 जागा आहेत. सर्व पाचही राज्यांसाठी 2021 च्या निवडणुका 26 फेब्रुवारी रोजी जाहीर झाल्या. बंगालमधील निवडणुकीचा शेवटचा टप्पा आठ टप्प्यात पार पडला होता.

## विचित्र धडक; ३ जणांचा मृत्यू, २ गंभीर

धाराशिव (दै. संध्या) : राज्यातील रस्ते अपघातांची मालिका सुरू असल्याचं दिसून येत आहे. गेल्याच आठवड्यात लातूरमध्ये भीषण अपघातात 4 जणांचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाचा आता धाराशिवमध्येही भीषण अपघाताची घटना घडली. लातूर-तुळजापूर महामार्गावर अपघात घडून तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. पाटोदा येथील पुलावर तीन वाहनांची जोरदार धडक झाली. या धडकेत वाहनातील तिघांचा मृत्यू झाला असून दोघे गंभीर जखमी आहेत. अपघातानंतर स्थानिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केलं, तसेच पोलिसांनाही कळविण्यात आलं. वाहनांची धडक इतकी तीव्र होती की, अपघातात तीन जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तसेच दोन जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



# पुण्यात मेट्रोचे २०० किमीचे जाळे उभारणार : देवेंद्र फडणवीस

### पुणे मेट्रो भवनचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे (दै. संध्या)**

पुणे मेट्रो प्रकल्पामुळे शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला मोठी चालना मिळाली असून पुणेकरांनी मेट्रो सेवेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. सध्या दररोज सुमारे अडीच लाख प्रवासी मेट्रोचा वापर करत आहेत. भविष्यात पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेले जवळपास २०० किलोमीटरचे मेट्रो जाळे उभारण्याचे नियोजन असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वेगाने विकसित होणाऱ्या नागरी विकासाचा विचार करून पुणे मेट्रो आणि नगर विकास विभागाने या संपूर्ण नेटवर्कचे सविस्तर नियोजन तातडीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याची ग्वाहीदेखील श्री. फडणवीस यांनी दिली.

**मेट्रो भवन, पुणे – ठळक वैशिष्ट्ये**

- एकूण क्षेत्रफळ सुमारे ८,१५० चौ. मीटर.
- भव्य स्वागत कक्ष व पुण्याच्या सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडविणारी कला स्थापना.
- अनुभव केंद्रात पुणे मेट्रोचे जाळे व प्रकल्पाची मॉडेल्स.
- ३१२ आसनक्षमतेचे सभागृह व बॅकअप संचालन नियंत्रण केंद्र, सिग्नलिंग व दूरसंचार सुविधा.
- काच दर्शनी भागामुळे नैसर्गिक प्रकाश, ऊर्जा कार्यक्षम व पर्यावरणपूरक रचना.

पुणे शहराच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेला बळकटी देणाऱ्या पुणे मेट्रो प्रकल्पाच्या प्रशासकीय मुख्यालय असलेल्या 'मेट्रो भवन'चे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, खासदार मेधा कुलकर्णी, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, हेमंत रासने, बापू पठारे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार तसेच महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुणे मेट्रो प्रकल्पाचे काम सुरुवातीला काही अडचणींमुळे उशिरा सुरू झाले असले तरी एकदा गती मिळाल्यानंतर अत्यंत वेगाने हा प्रकल्प पूर्ण करण्यात आला. देशातील सर्वाधिक गतिमानतेने पूर्ण होणाऱ्या मेट्रो प्रकल्पांमध्ये पुणे मेट्रोचा उल्लेख केला जातो. मेट्रो स्थानकांचे आधुनिक डिझाइन, मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी, प्रवासी सुविधा तसेच अत्याधुनिक तांत्रिक प्रणाली या सर्व बाबींमध्ये उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे. सध्या पुणे शहरात सुमारे ३३ किलोमीटरचा मेट्रो मार्ग कार्यान्वित झाला आहे. टाटा समूहाच्या सहकार्याने देशातील पहिल्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) असलेल्या २३ किलोमीटरच्या मेट्रो प्रकल्पाचे कामही अंतिम टप्प्यात असून त्यापैकी १२ किलोमीटर मार्गाचे उद्घाटन मे महिन्यात, तर उर्वरित ११ किलोमीटर मार्ग जुलै महिन्यात सुरू करण्याचे नियोजन आहे. या दोन्ही प्रकल्पांसह पुण्यातील मेट्रोचे एकूण जाळे सुमारे ५६ किलोमीटरपर्यंत पोहोचणार आहे. याशिवाय आणखी ५५ किलोमीटरचे काम सुरू असून सुमारे ८० किलोमीटरचा विस्तार प्रस्तावित आहे. भविष्यात पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि पीएमआरडीए क्षेत्राचा समावेश असलेले जवळपास २०० किलोमीटरचे मेट्रो नेटवर्क उभारण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले. पुण्याचा वेगाने होणारा नागरी विकास लक्षात घेता या संपूर्ण २०० किलोमीटर नेटवर्कचे सविस्तर नियोजन तातडीने पूर्ण करावे, सर्व मार्गांचे डीपीआर एकत्रितपणे तयार करावेत तसेच भविष्यातील ग्रोथ सेंटर्स, नवीन विमानतळ, औद्योगिक क्षेत्रे आणि वाढती उपनगरे यांचा विचार करून मेट्रोचे जाळे विकसित करावे, अशा सूचना त्यांनी महामेट्रो प्रशासनाला दिल्या. पुढील काळात जमिनीवर, आकाशात आणि भुयारी मार्गांद्वारे वाहतूक व्यवस्था विकसित करून पुणे शहर वाहतूक कोंडीरहित आणि शाश्वत शहर बनविण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

### पुणे मेट्रो भवन अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज – उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार




उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, पुणे मेट्रो भवन केवळ प्रशासकीय मुख्यालय नसून आधुनिक पुण्याच्या प्रगतीचे प्रतीक आहे. अत्याधुनिक अभियांत्रिकी आणि सुयोग्य नियोजनाचा उत्कृष्ट नमुना असलेली ही इमारत पुण्याच्या प्रशासकीय वैभवात महत्त्वाची भर घालणारी ठरेल. पुणे मेट्रोसाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलेल्या कामाचेही त्यांनी स्मरण केले. मुळा-मुठा नदीकाठावर उभारलेले हे भवन पर्यावरणाशी सुसंगत अशा पद्धतीने विकसित करण्यात आले आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही राज्याच्या विकासाची महत्त्वाची केंद्रे असल्याने येथे वाढत्या लोकसंख्येमुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला होता. त्या पार्श्वभूमीवर महायुती सरकारने रिंग रोड, रुंद रस्ते, सेवा रस्ते, भुयारी मार्ग, पूल तसेच मेट्रोसारखे मोठे प्रकल्प राबवून वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी ठोस पावले उचलली असल्याचेही श्रीमती पवार यांनी नमूद केले. स्वारगेट–कात्रज, पिंपरी-चिंचवड–भक्तीशक्ती चौक, वनाज–चांदणी चौक, रामवाडी–वाघोली, खडकवासला–खराडी, वारजे–नळस्टॉप तसेच हडपसर–सासवड आणि हडपसर–लोणी काळभोर या महत्त्वाच्या मेट्रो मार्गांना गती देण्यात आली आहे. भविष्यात पुणे विमानतळ आणि चाकण एमआयडीसी यांनाही मेट्रोने जोडण्याचा विचार पुढे नेण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर यांनी प्रास्ताविकात पुणे मेट्रो प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. मेट्रो भवनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या विविध सुविधांची माहितीदेखील त्यांनी दिली. आता पुणे मेट्रोला सुसज्ज असं मेट्रो भवन मिळालं आहे, निश्चितपणे अधिक गतीने आम्ही काम करु.

## दिराकडून सख्या भावजयीवर कोयत्याने सपासप वार

### आंबेगाव तालुक्यात खळबळ, आधी दिली होती धमकी!

**पारगाव (दै. संध्या)**



धामणी ता. आंबेगाव येथे घराच्या जागेच्या वादावरून दिराने सख्या भावजयीवर कोयत्याने प्राणघातक वार केले यामध्ये नंदा तानाजी सोनवणे (वय ६० वर्ष) या गंभीर जखमी झाल्या या प्रकरणी पारगाव कारखाना पोलिसांनी सुरेश धोंडीबा सोनवणे (मुळगाव -धामणी) सध्या रा. केडगाव चौफुला ता. दौड याला आज रविवारी ताब्यात घेतले आहे.

पारगाव कारखाना पोलिसांनी दिलेल्या माहितीवरून काल शनिवारी संध्याकाळी ६ ते रात्री ८ वाजण्याच्या सुमारास नंदा तानाजी सोनवणे घरी असताना त्यांचा दीर सुरेश सोनवणे हा दारु पिवुन येऊन त्यांना शिवीगाळ करून तुमचा एक एकाचा मर्डर करतो अशी धमकी दिली. तेथुन निघुन गेला. त्यानंतर गावातील जिल्हा परिषद शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम होता. या कार्यक्रमासाठी नंदा तानाजी सोनवणे व त्यांचा मुलगा संपत सोनवणे, सुन शीतल संपत सोनवणे , पुजा बाबुराव सोनवणे गेले होते. कार्यक्रम चालु असताना रात्री आठ वाजण्याच्या सुमारास नंदा सोनवणे या कार्यक्रमाच्या ठिकाणावरुन जात असताना शिवशंकर दुध डेअरीच्या समोर अचानक सुरेश सोनवणे हा हातात कोयता घेऊन नंदा सोनवणे यांच्यावर धावून आला व तुला आत्ता जिवंत सोडत नाही. तुझा मर्डरच करतो असे म्हणून जिवे मारण्याच्या उद्देशाने त्याने त्यांच्या डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी दोन्ही हात बचावासाठी पुढे केले असता त्यांच्या दोन्ही हातावर कोयत्याने वार केले. दोन्ही हातावर गंभीर दुखापत होवुन दोन्ही हात फ्रॅक्चर झाले नंदा सोनवणे सदर ठिकाणावरून जीव वाचविण्यासाठी पळण्याचा प्रयत्न केला असता त्याने पाठीमागुन कोयत्याने पाठीवर उजवे बाजुस वार करून गंभीर दुखापत केली. त्यांनी आरडाओरडा केला असता मुलगा संपत सुन पुजा व शितल तेथे आले असता सुरेश सोनवणे याने शिवीगाळ करत तुमचा एकएकाचा मर्डर करतो अशी धमकी देवुन कोयता घेवुन पळून गेला.

## ग्राम सेवकावरही गुन्हा दाखल

बीड (दै. संध्या) : राज्यात गेल्या काही दिवसांपासून कायम चर्चेत असलेल्या आणि गुन्हेगारी प्रकरणांनी गाजत असलेल्या बीड जिल्ह्यात पुन्हा एकदा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अल्पवयीन महिलेस घरातून नेऊन तिच्यावर अत्याचार करण्यात आला आहे. याप्रकरणी, महिला आयोगाने दखल घेतली आहे. बीड जिल्ह्यातील हिवरा पहाडी येथील महिला रात्री घरी झोपलेली असताना घरातून उचलून नेत तिच्यावर लैंगिक अत्याचार करून रात्रभर गावच्या चावडीवर बांधून ठेवल्याची बातमी माध्यमातून समोर आली आहे. राज्य महिला आयोगाने याची दखल घेतली असून तपास अधिकाऱ्यांशी फोनवरुन संवाद साधला. आता, पीडित अल्पवयीन महिलेच्या विवाहावरुनही गुन्हा दाखल करण्याचे आदेश आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी दिले आहेत.

*पुण्यात शिवाजीनगर आणि पेठ परिसरात*

## लो एमिशन झोन लागू करण्याबाबत प्रशासनाचे मंथन

पुणे (दै. संध्या) : पुणे शहरातील वाढत्या वायू प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी शिवाजीनगर व पेठ परिसरात 'लो एमिशन झोन' (कमी प्रदूषण क्षेत्र) लागू करण्याबाबत प्रशासनाकडून विचारमंथन सुरू आहे. या क्षेत्रात जास्त प्रदूषण करणाऱ्या वाहनांना प्रवेशासाठी विशेष प्रदूषण शुल्क आकारण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात विविध तज्ञ संस्था आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे महानगरपालिका आयुक्त नवल किशोर राम, पुणे महानगरपालिकेचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी व वाहतूक नियोजन क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

## दशक्रिया विधी



**कै. बापुसाहेब उर्फ लालासो यशवंत बोधे**

*कळविण्यात अत्यंत दुःख होते की,*
*कै. बापुसाहेब उर्फ लालासो यशवंत बोधे*
*वय ७१ वर्षे यांचे मंगळवार दि.१० मार्च २०२६ रोजी*
*अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले.*
*त्यांच्या आत्म्यास चिर:शांती लाभो हिच ईश्वर चरणी प्रार्थना.*

**दशक्रियाविधी :** सोमवार, दि.१६ मार्च २०२६ रोजी सकाळी ८. ३० वा.
**स्थळ :** मुळा मुठा नदीकिनारी कोरेगावमुळ, ता.हवेली, जि.पुणे

**शोकाकुल**

- श्रीमती लिलावती बापुसाहेब बोधे (पत्नी)
- माजी उपसरपंच - सदस्य, ग्रामपंचायत कोरेगावमुळ
- राजेंद्र बापुसाहेब बोधे (मुलगा) आदर्श शिक्षक पुणे जिल्हा परिषद उपशिक्षक, महात्मा गांधी विद्यालय उरुळी कांचन
- संतोष बापुसाहेब बोधे (मुलगा)
- गव्हमेंट कॉन्ट्रॅक्टर
- समस्त बोधे परिवार - समस्त ग्रामस्थ कोरेगावमुळ (ता.हवेली)
- प्रवचन सेवा, महंत श्री.टेंभूरकर बाबा महानुभाव तिन्हेवाडी (राजगुरुनगर)

# देशाची अन्नसुरक्षा, आर्थिक स्थैर्यासाठी कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची

## राज्यपाल जिष्णू देव वर्मा : महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा 39 वा पदवीप्रदान समारंभ संपन्न

**अहिल्यानगर (दै. संध्या)**



जगातील एका भागातील युद्ध व संघर्षाचा परिणाम सर्वत्र होत असल्याने देशाची कृषी व्यवस्था अधिक सक्षम करणे व अन्नसुरक्षा सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. देशाच्या अन्नसुरक्षा, आर्थिक स्थैर्य व शाश्वत विकासासाठी कृषी क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून भारतीय कृषीचे भविष्य तंत्रज्ञानाधारित उपाय, स्टार्टअप्स व शाश्वत पद्धतींवर अवलंबून आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलपती जिष्णू देव वर्मा यांनी केले. राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात आयोजित 39 व्या पदवीप्रदान समारंभात ते बोलत होते. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राज्यपालांच्या हस्ते 'डॉक्टर ऑफ सायन्स' या मानद पदवीने सन्मानित करण्यात आले. यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, राज्याचे जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील व कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रतिकुलपती दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती होती. नवी दिल्ली येथील भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (आयसीएआर) माजी संचालक डॉ. अशोक कुमार सिंह, कुलगुरू डॉ. विलास खर्चे व राज्यपालांचे सचिव प्रशांत नारनवरे उपस्थित होते. राज्यपाल श्री. वर्मा म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'जय जवान, जय किसान, जय विज्ञान' याबरोबरच 'जय अनुसंधान' घोषणा दिली आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हवामान बदल, तांत्रिक प्रगती व बदलते जागतिक परिदृश्य यामुळे कृषी क्षेत्रात दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व नवकल्पनांची गरज आहे. नैसर्गिक व शाश्वत शेती पद्धतींच्या प्रसारात तसेच देशातील पहिले 'रिमोट पायलट ट्रेनिंग ऑर्गनायझेशन' स्थापन करण्यात विद्यापीठाने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या विद्यापीठात होत असलेल्या प्रभावी अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त करून राज्यपाल म्हणाले, विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता कृषी नवकल्पना व उद्योजकता स्वीकारावी. राज्य शासन कृषी क्षेत्रातील नवकल्पना व ग्रामीण विकासासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यास कटिबद्ध आहे, असेही त्यांनी नमूद केले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षांत शेती क्षेत्रात मूलगामी बदल करण्याचे काम शासनाने केले आहे. पायाभूत सुविधांमध्ये शाश्वत बदल करून कृषी क्षेत्रात गुंतवणूक वाढविता येईल. पावसाचा पडणारा थेंब अन् थेंब साठविला पाहिजे, यासाठी शासनाने जलयुक्त शिवार योजना आणली; ज्यामुळे महाराष्ट्रात भूजल पातळी वाढली. 'मागेल त्याला शेततळे' योजनेच्या अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्हा अग्रेसर राहिला आहे. शेतकऱ्यांना पाणी सुरक्षेबरोबर वीज सुरक्षेसाठी मुख्यमंत्री सौर कृषी योजना सुरू करण्यात आली आहे.

## संपादकीय

# धन चालवावे युक्ती...

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेतील पैसा हा खेळता असावा; तो तिजोरीत बंदिस्त राहू नये. धनाचा वापर योग्य व्यवहाराने, प्रामाणिकपणे आणि समाजहित लक्षात ठेवून व्हावा, हे तत्त्व आधुनिक बँकिंग व्यवस्थेलाही लागू होतेच. संपूर्ण आठवड्यातला प्रश्नोत्तर तास गोंधळातच वाया गेलेल्या लोकसभेत विचारलेल्या एका लेखी प्रश्नाला केंद्रीय अर्थमंत्रालयाने दिलेल्या उत्तरानं बँकिंग व्यवस्थेतल्या एका वेगळ्याच वास्तवावर प्रकाश टाकला आहे. अर्थमंत्रालयाच्या माहितीनुसार २०२२ ते २०२५ या काळात देशातील सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील बँकांनी किमान मासिक सरासरी शिल्लक न राखल्यामुळे ठेवीदारांकडून सुमारे ८०९२.८३ कोटी रुपये शुल्क म्हणून गोळा केले. यात जनधन योजनेच्या व मूलभूत बचत बँक ठेवींच्या सुमारे ७२ कोटी खातेधारकांचा समावेश नाही. तसं पाहिल्यास ही रक्कम आपल्या बँकिंग व्यवस्थेच्या त्याच काळातील एकूण उत्पन्नाच्या जेमतेम सुमारे ०.२३ टक्के असली तरी देशातील सामाजिक संदर्भामुळं ही रक्कम महत्त्वाची ठरते. अनेक बँका अजूनही सर्वसाधारण बचत खात्यांत किमान मासिक सरासरी शिल्लक (एमएबी) न ठेवल्यास दंड आकारतात. दुसरीकडे स्टेट बँक ऑफ इंडियानं करोनादरम्यान, मार्च २०२०पासून बचत खात्यांवरील किमान शिलकीबाबतचा दंड रद्द केलाय. मागच्याच वर्षी सार्वजनिक क्षेत्रातल्या आणखी काही बँकांनीही असंच पाऊल उचललं आहे. बँकिंग व्यवस्थेतला यापेक्षाही अधिक मोठा विषय म्हणजे निष्क्रिय खाती आणि मुदत संपूनही न काढलेल्या ठेवी. २०२३पर्यंत सार्वजनिक आणि खासगी बँकांमध्ये मिळून सुमारे ३५ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कम अशी होती जी दहा वर्षांपेक्षा जास्त काळ निष्क्रिय खात्यांमध्ये होती आणि नंतर ती ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधीमध्ये (डीईएएफ) हस्तांतरित करण्यात आली होती. यंदा जानेवारीपर्यंत ही रक्कम तब्बल एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली. अर्थात एखाद्या ठेवीदारानं दावा केल्यास बँक ते पैसे परत देते आणि नंतर रिझर्व्ह बँकेकडून परत मिळवते. अलीकडे नरेंद्र मोदी सरकारने बँकिंग व्यवस्थेतील अशा विस्मरणात गेलेल्या ठेवी शोधण्यासाठी उद्गम (UDGAM) हे ऑनलाइन पोर्टल तयार केलं आहे. अर्थात बँका या ठेवींचा उपयोग त्यांच्या एकूण निधी व्यवस्थापनात करतात, असे मानले जाते. परंतु कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेतील पैसा हा खेळता असावा; तो तिजोरीत बंदिस्त राहू नये हेही तत्त्व आहेच. तुकोबा हेच तत्त्व 'जोडूनिया धन उत्तम व्यवहारे...' अशा वेगळ्या प्रकारे सांगतात. धनाचा वापर योग्य व्यवहाराने, प्रामाणिकपणे आणि समाजहित लक्षात ठेवून व्हावा हे तत्त्व आधुनिक बँकिंग व्यवस्थेलाही लागू होतेच की. या संदर्भात एक महत्त्वाचा प्रश्न अनुत्तरित राहतो. किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल आकारण्यात आलेल्या या आठ हजार कोटींहून जास्त रकमेचा वापर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची बँकिंग सेवा सुधारण्यासाठी, ग्रामीण भागातील शाखा सुविधा, डिजिटल बँकिंगची गुणवत्ता, ग्राहक सेवा किंवा तांत्रिक पायाभूत सुविधा आदींसाठी केला जातो का, याबाबत सरकारने कोणतीही स्पष्ट माहिती दिलेली नाही. भारतात शेअर बाजार, विमा पॉलिसी, भविष्यनिर्वाह निधी आणि इतर वित्तीय साधनांमध्येही एकत्रितपणे सुमारे साडेतीन लाख कोटी रुपयांपर्यंत निनावी आर्थिक मालमत्ता असू शकते आणि ती शोधून योग्य मालकांना परत देण्याची प्रक्रिया अधिक प्रभावी असावी, ही अपेक्षा गैर नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या याबाबतच्या निर्देशानंतर बँकिंग नियामक, विमा नियामक आणि बाजार नियामक संस्थांनी अशा मालमत्तेचा मागोवा घेण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या. किमान शिल्लक न ठेवल्याबद्दल आकारलेलं हे वार्षिक किंवा अल्पकालीन शुल्क आहे, तर दुसरीकडं लाखो कोटी रुपयांच्या आसपास असलेल्या निनावी ठेवी ही अनेक वर्षांतील निष्क्रिय पण एकत्रित रक्कम आहे. इथं आणखी एक तुलना उपयुक्त ठरावी. भारत हा जगातील सर्वांत मोठ्या कच्च्या तेल आयातदारांपैकी एक आहे. आपण दररोज सुमारे पाच दशलक्ष बॅरल कच्चं तेल आयात करतो. अमेरिकेनं इराणवर हल्ला करून जगाच्या तेलबाजारातही आग लावली त्याच सुमारास, यंदाच्या फेब्रुवारीत आंतरराष्ट्रीय बाजारातील तेलाची किंमत ८०-८५ डॉलर प्रति बॅरल मानली तर देशाचा एका दिवसाचा आयात खर्च साधारण ४०० दशलक्ष डॉलर किंवा सुमारे ३,३००-३,५०० कोटी रुपये इतका होतो.

## गुरु वचन

### आध्यात्मिक आणि भौतिक धन एकत्र मिळत नाही

संसारात दोन प्रकारचे धन असते. भौतिक धन आणि दुसरे आध्यात्मिक धन. मनुष्याचा स्वभाव आहे की, तो जास्तीत जास्त धन कमवू इच्छितो. एखादी व्यक्ती सोने, चांदी, रूपयांचा ढिग लावल्याने धनवान म्हटला जातो. तर कोणी उपाशी, तहानलेला राहूनही धनवान म्हटला जातो. वास्तवात धनवान दोघेही आहेत. एक भौतिक धनाचा धनी आहे तर दुसरा अध्यात्मिक धनाचा धनी आहे.

शास्त्र आणि पुराण सांगातात की, दोन्ही धनात अध्यात्म रूपी धन जास्त श्रेष्ठ आहे. कारण हे धन कोणी चोरून घेऊ शकत नाही. ज्याच्याकडे अध्यात्म रूपी धन असते तो निश्चिंत असतो. त्याला कोणत्याही प्रकारची चिंता आणि भीती नसते. संसारात कोणतीही व्यक्ती अशी नाही जी एकत्र या दोन्ही संपत्तीचे सुख प्राप्त करू शकेल.

अध्यात्म आणि भौतिक धन दोन्ही दोन नावासमान आहेत. दोन्ही नावांतून एकाचवेळी प्रवास करता येत नाही, हे आपल्याला चांगल्याप्रकारे ठाऊक आहे. असे करण्याचा प्रयत्न केला तर बुडणे निश्चित असते. आपल्याला अध्यात्मिक धन अर्जित करून ईश्वराचे ऋण फेडायचे आणि जीवन-मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळवायची की भौतिक धन अर्जित करून सांसारिक सुखाचा आनंद घ्यायचा आणि वारंवार जीवन-मरणाच्या चक्रात अडकून पापफळ प्राप्त करायचे, हे आपल्या हाती आहे.

भागवत् म्हणते ईश्वर ज्याच्यावर प्रेम करतो त्याचे सर्वकाही हिरावून घेतो. सर्वकाही हिरावून घेण्याचा अर्थ आहे सांसारिक सुख हिरावून घेणे. कबीर दास, तुलसीदास, रहीम, मीराबाई, सूरदास, करमैतीबाई याची उदाहरणे आहेत. येशू ख्रिस्तानेही म्हटले की, एकवेळ सूईच्या छिद्रातून ऊंट जाईल. मात्र श्रीमंत माणूस स्वर्ग प्राप्त करू शकत नाही. स्वर्ग न मिळण्याचा अर्थ आहे, ईश्वराची कृपा प्राप्त नसणे.

त्याचे कारण जेव्हा खूप धन येते व्यक्ती धन सांभाळणे आणि त्याच्या सुरक्षेबाबत सदैव चिंतित असतो. ईश्वरासाठी त्याच्याकडे वेळ नसतो. आणि भक्ती भावनाही नसते. धनाच्या अहंकारात व्यक्ती ईश्वरीय सत्तेलाही आव्हान देऊ लागतो. तीर्थस्थळांस पर्यटन स्थळ मानून त्याचा अपमान करतो. त्यामुळे अध्याात्मिक धन आणि सांसारिक धन एकत्र मिळू शकत नाही, असे म्हटले जाते.

## उपदेशकथा

### स्वभाव

समानशिले व्यवनेषु सख्यम हे सुभाषित आपण वारंवार ऐकतो आणि त्याचे प्रत्यंतर समाजात वावरताना आपणाला पदोपदी येतेही. याच सुभाषिताचा दाखला देणारी ही कथा. एका साध्या संवादातून आपणास बोध मिळेल. एकदा प्रचंड महापूर आल्याने नदीच्या पात्रातून दोन भांडी वाहत होती. त्यापैकी एक भांडे होते पितळेचे तर दुसरे भांडे होते मातीचे. त्या पुरातून वाहत जातानाच त्यांच्यातून संवाद चालला होता. पितळेचे भांडे मातीच्या भांड्याला म्हणत होते, मित्रा, तू इतक्या दुरुन का चालला आहेस? माझ्याजवळ ये. आपण दोघे हातात हात घालून जाऊ. कशी मजा येईल. मला तुला डोळे भरून पाहता येईल आणि प्रचंड वेगाने वाहणाऱ्या या पाण्यापासून तुझे रक्षणही करता येईल. मातीच्या भांड्याने पितळेच्या भांड्याचे आभार मानले आणि ते म्हणाले, कृपा करून कोणत्याही स्थितीत तू माझ्याजवळ येऊ नकोस. तुझीच मला सर्वात जास्त भीती आहे. तुझा थोडासा जरी धक्का मला लागला तरी माझ्या ठिकऱ्या उडतील. तुझा-माझा स्वभावच भिन्न आहे.

कथा उपदेश : भिन्न स्वभावांचे, छंदांचे लोक एकत्र कसे येणार?

## पंचांग

| | |
|---|---|
| १६ मार्च २०२६ | योग:शिव ०९:३६:०८ |
| सोमवार | करण:तैतिल ०९:४१:०६ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:गर २१:३७:२२ |
| फाल्गुन शके | सूर्य:मीन |
| संवत्- १९४७ | चन्द्र:कुम्भ१८:१४:०२ |
| संवत्सर - विश्वावसूनाम | हिजरी सन् - १४४६ |
| अयन- उत्तरायणारंभ | मुस्लिम मास - रमजान |
| मास- फाल्गुन | तारीख -२६ |
| ऋतु- सौर वसंत | विशेष |
| कृष्ण पक्ष | सोमप्रदोष |
| तिथि:द्वादशी ०९:४१:०६ | श्री योगानंद सरस्वती |
| नक्षत्र:धनिष्ठा | महाराज पुण्यतिथी |
| ३०:२१:५९+ | - गुंज (परभणी) |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | 7 | | | 8 | | 5 | 4 |
| | | | | 1 | | 8 | | 7 |
| 8 | | 6 | | | 7 | | | |
| 4 | | | 1 | | 9 | 6 | 7 | |
| 7 | | 2 | | | | 4 | | 9 |
| | 6 | 5 | 7 | | 3 | | | 1 |
| | | | 4 | | | 1 | | 3 |
| 2 | | 4 | | 3 | | | | |
| 3 | 9 | | 6 | | | 5 | 4 | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

- उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८८७ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 9 | 5 | 3 | 1 | 2 | 7 | 6 |
| 2 | 5 | 7 | 4 | 6 | 9 | 1 | 8 | 3 |
| 6 | 3 | 1 | 8 | 7 | 2 | 5 | 4 | 9 |
| 9 | 6 | 5 | 7 | 2 | 8 | 4 | 3 | 1 |
| 3 | 7 | 2 | 1 | 4 | 5 | 9 | 6 | 8 |
| 1 | 8 | 4 | 6 | 9 | 3 | 7 | 5 | 2 |
| 5 | 9 | 6 | 3 | 1 | 7 | 8 | 2 | 4 |
| 7 | 1 | 3 | 2 | 8 | 4 | 6 | 9 | 5 |
| 4 | 2 | 8 | 9 | 5 | 6 | 3 | 1 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९६८ - अमेरिकन सैनिकांच्या सात तुकड्या मायलाय या व्हिएतनामी खेड्यात घुसल्या. येथील १७५ निरपराध नागरिकांची त्यांनी हत्या केली. यात स्त्रिया व मुले यांचाही समावेश होता.
- १९९८ - कॅथलीन लिली या स्त्रीने केलेल्या विनयभंगाच्या आरोपानंतर बिल क्लिंटन यांची लोकप्रियता वाढल्याचे एका सर्व्हेक्षणात दिसून आले. तिने १५ मार्च रोजी हा आरोप केला होता.
- २००४ - मुथय्या मुरलीधरनने ५००वा कसोटी बळी घेतला.
- २००८ - चीनच्या पंतप्रधानपदी वेन जिआबो यांची फेरनिवड करण्यात आली.

### राष्ट्रीय

- १९५६ - भाषावर राज्यात पुनर्रचनेचा प्रस्ताव संसदेत सादर करण्यात आला.
- २००५ - भारतीय फलंदाज सचिन तेंडुलकरने कसोटी क्रिकेटमध्ये १० हजार धावा पूर्ण केल्या.

### जन्म

- १८८० - बंगाली लेखक परशुराम (राजशेखर बसू) यांचा जन्म.
- १९२६ - जेरी लुईस (जोसेफ लेव्हिच) या अमेरिकन विनोदविराचा जन्म.
- १९७४ - झिम्बाब्वेचा जलदगती गोलंदाज व माजी कर्णधार हीथ स्ट्रीकचा जन्म.

### निधन

- १८८८ - सुप्रसिद्ध प्राच्याविद्या संशोधक पंडित इंद्रजी भगवानलाल यांचे निधन.
- १९४६ - कोल्हापूरचे दरबारी गायक अल्लादिया खाँ यांचे निधन.
- २००५ - श्रीराम पुजारी या संगीततज्ज्ञ रसिकाचे निधन. त्याचे अनेक साहित्याकांशी मित्रत्वाचे संबंध होते.

## : SMS :

Tourist: Whose skeleton is that?
Sardar: An old kingâ€™s skeleton.
Tourist: Whoâ€™s that smaller skeleton next to it?
Sardar: That was same kingâ€™s skeleton when he was a child.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३ | २३.९ |
| अहमदनगर | ३२.५ | २२.३ |
| अकोला | ३६.५ | २५.६ |
| अमरावती | ३५.४ | २५.१ |
| बीड | ३९.१ | २४.२ |
| भंडारा | ३९.४ | २२.५ |
| बुलढाणा | २९ | १७.९ |
| चंद्रपूर | ४०.२ | २४.६ |
| चेन्नई | ३६.३ | २२.३ |
| नवी दिल्ली | २९.७ | १९.३ |
| धुळे | ३५.७ | २४.९ |
| गोंदिया | ३७.६ | २१.६ |
| जळगाव | ३६.९ | २४.९ |
| कोल्हापूर | ३४ | २०.४ |
| लातूर | ३४.२ | २४.३ |
| मुंबई | ३५.५ | २६.५ |
| नागपूर | ३६.७ | २३.१ |
| नांदेड | ३६.६ | २५ |
| नंदूरबार | ३३ | २५.१ |
| नाशिक | ३३.३ | २१.१ |
| पुणे | ३२.८ | २२.२ |
| पंढरपूर | ३५.४ | २४.८ |
| सातारा | ३४.२ | २०.७ |
| सांगली | ३५.२ | २१.८ |
| सोलापूर | ३५.६ | २६.४ |
| वर्धा | ३७.३ | २५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : केसरी, शुभ दिशा : उत्तर कौटुंबिक सहकार्याने आपला दिवस चांगला जाणार आहे.

**तुळ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पश्चिम आपल्या कामात बदल होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर मानसिक अस्थिरता दूर होईल. सामाजिक कामात मान सन्मान मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम आपला आहार वेळेवर घ्या. नोकरी व्यवसायात अडचणी येतील.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा,शुभ दिशा: उत्तर स्वत:चे निर्णय स्वत: घ्या फायदेशीर राहतील. मुलांच्या बाबतीत चांगले संदेश मिळतील. व्यापारात नवीन संबंध जुळतील.

**धनु :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर आर्थिक तंगी निर्माण झाल्यामुळे मानसिक ताण वाढणार आहे. मुलांच्या कामाबल चिंता राहील.

**कर्क :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: उत्तर कौटुंबिक वातावरण व आर्थिक परिस्थिती चांगली राहिल्याने आनंदी रहाल. आपल्या वस्तूची देखभाल करा.

**मकर :** शुभ रंग केसरी, शुभ दिशा- उत्तर आळस झटकून कामाला लागा. जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. नवीन योजना कार्यान्वयीत होईल.


**सिंह :** शुभ रंग: हिरवा,शुभ दिशा: पूर्व मित्रांच्या सहकार्याने नवीन कामात यश मिळण्याचे योग आहेत. व्यापारात वेळेवर घेतलेले निर्णय फायदेशीर ठरतील.

**कुंभ :** शुभ रंग : गुलाबी, शुभ दिशा :पूर्व कायद्याचे प्रकरणे सुटतील परंतु धैर्य व संयम बाळगणे आवश्यक आहे.

**कन्या :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा : पश्चिम अडकून पडलेली कामे पूर्ण होतील. जिवन स्थिर झाल्याचा आनंद मिळेल.

**मीन :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा : पूर्व व्यवसायात यश मिळेल. दूरदर्शीपणामुळे अनेक अडचणींना व्यवस्थीत हाताळाल. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

## 'दैं. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८८



**आडवे शब्द**

१. झी मराठीवरील आणखी एक नायिकाप्रधान मालिका!
४. कडा दुमडलेली करंजी
७. मजेत रेंगाळत
१२. इच्छित प्राप्तीची आज्ञा
१३. मल्ल
१५. हिंदीत पण-परंतु
१६. कागदी चलन
१७. हिंदी चित्रपटगीतात भेटणारा परमेश्वर
१८. अंगावरील बारीक केस
१९. पत्त्यातील जोडपे
२१. असक्ती
२२. लोकनाट्य
२४. नामघोष
२८. विशेष
२९. मृत्तिकाकण
३१. जेमतेम
३३. शिकार
३६. कोळ्यांचा व्यवसाय
३८. शिव शिव
४०. काया व अंत:करण
४३. साडेतीन मुहूर्तांपैकी एक
४५. नवऱ्याची एखादी सवय वा वस्तूही बायकांना हिच्याप्रमाणे वाटू शकते!
४६. वडिलांचे इंग्रजी संबोधन
४७. भूगोलातील एक 'वृत्त'
४८. टॉनिकला आयुर्वेदातील शब्द
४९. शिखराचे टोक
५०. नित्य, सलग
५१. प्रामाणिक
५२. अभिप्राय
५४. निकट, जवळ
५६. पत्र
५८. धाड घालून पिक फस्त करणारा किडा
५९. विनासायास, विनाकारण
६२. छोटे कुबड
६३. पाऊस (हिंदी)
६५. न वापरलेली
६६. इंद्रिय
६७. कंजूष
६९. मागणारा
७०. खून करणे, वध करणे
७३. बिनवासाचे पांढरे फूल
७५. रशिया (हिंदी)
७७. माणूस
७९. स्वप्नरंजनातील पहिला शब्द
८०. सैन्याचा मालपुरवठा
८४. यातनामय जिणे
८५. चार वेदांपैकी एक
८६. यथेच्छ

**उभे शब्द**

१. पौगंडावस्था
२. धांदल, गडबड
३. एक ज्वालाग्रही सुगंधी पदार्थ
४. पानात उजवीकडे वाढले जाणारे पदार्थ, उदा.भाजी, इ.
५. नूतन
६. सिंह
७. रम्य
८. नंतर
९. होडी
१०. शिवसेनेतील 'पंत'
११. किल्ल्याभोवतीची भिंत
१४. शेवटचा सूर लांबवून बोलणे
२०. सुकुमार
२१. संधी
२३. जनावरांची कत्तल करणारा
२५. सोन्याचा धागा
२६. नवरा
२६अ. चांगला (अनेकदा उपरोधाने वापरला जाणारा शब्द)
२७. वस्ती
२८. कंड, खुमखुमी
३०. कुटुंब, गोतावळा
३१. छिद्रातून सांडणारे ऊन
३२. धैर्य, धाडस
३४. आशीर्वाद
३५. गप्प बसण्याचे व्रत
३७. मोहक, नशा आणणारे
३९. बारीक झणझण
४०. शोध, माग
४१. चेन्नईचे ब्रिटिशकालीन नाव
४३. परीक्षा घेणे, तपासणे
४४. व्यार्थ जाणारे, निरर्थक
४६. हालचालीवर ठेवलेली नजर
४७. स्वार्थ, हिंदीत अर्थ
४९. सरोज, पंकज
५१. वर्ष
५३. आक्षेप नाही या अर्थी प्रमाणपत्र
५७. पाण्याची जागा, जलाशय
५८. अणकुचीदार
५९. कारण
६०. ज्याप्रमाणे
६१. अनामत, गुंतविलेली रक्कम
६४. सिद्ध
६५. शेळीचे पिल्लू
६६. असाधारण
६८. सापाची एक जात
७१. धोबी
७२. संगीतातील एक राग
७४. उष्ण
७६. एक तारवाद्य
७८. अरण्य
८१. लंकर्णच पण गाढव नाही!
८२. धमकी
८३. पथक, समूह, गट

**जम्बो शब्दकोडे क्र. ८८७ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.चिरा ३.विसराळू ६.बापजादे १०.गोंगाट १२.मित्र १३.विहीण १४.शरयू १६.गडद १८.वसुधा २०.जोम २१.तूप २३.कीटक २५.लत २७.हाड २९.काळीज ३१.वीर ३२.वंद्य ३३.कवाड ३५.पोत ३६.गवत ३८.धग ३९.निवास ४०.खापर ४१.तूर ४२.क्रूर ४३.बाग ४४.घसट ४७.पतकरलेले ५०.नावडता ५१.कडा ५१अ.गप ५२.पोरकट ५४.बहीण ५५.रगड ५७.घट्ट ५८.खेळ ५९.वचा ६०.पापडी ६१.शर ६३.पाश ६४.उशीर ६५.टर ६६.पळवाट ६९.टकमक ७१.लाजाहोम ७४.वेणू ७५.काका ७७.वजा ७८.अटळ ७९.तुल्य ८०.चोर ८१.उडी ८३.वारू ८४.झेला ८५.खेळी ८६.मामा ८७.आभाळ ८८.बेघर

उभे उत्तर : १.चिराग २.डोंगा ४.समिधा ५.रात्र ६.बाही ७.पणतू ८.देश ९.वायू १०.गोंद ११.टवटवीत १३.विमल १५.रक्त १७.डहाळी १९.सुकर २२.पहाड २४.लवंग २६.तकवा २८.कातर २९.काडतूस ३०.जग ३४.वास ३५.पोपट ३७.वर्ण ३८.धरपकड ३९.निगरगट्ट ४०.खासदार ४३.बाक ४५.लवण ४६.म्हतारपण ४८.तडा ४८अ.लेप ४९.वाटचाल ५०.नाही कशी म्हणू तुला ५२.पोळपाट लाटणे ५३.कव ५६.गडी ५७.घर ६१.शरम ६२.ओळख ६५.टकळी ६७.टाहो ६८.हेका ७०.कवडी ७२.जाळ ७३.मगरूर ७६.काचोळी ८१.उमा ८२.रंभा ८३.वाघ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महिला दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ पुणे संस्कृती तर्फे प्रेरणादायी कार्यक्रम संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ पुणे संस्कृती, एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ होम सायन्स, पुणे आणि मानसी फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या सन्मानार्थ प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात समाजकार्य व महिला सशक्तीकरण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दोन मान्यवर महिलांचा मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्ती म्हणून प्रा. शीतल मोरे आणि शुभदा गोडबोले यांचा गौरव करण्यात आला. त्यांच्या कार्याचा आढावा घेणाऱ्या मानपत्राचे वाचन प्रज्ञा वझे आणि स्मिता कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमात सीए सर्वेश मेहंदळे यांनी "स्त्रीचे मनोबल आणि सकारात्मकता" या विषयावर मार्गदर्शन केले. तसेच नितिन शेलार यांनी मुलींसाठी स्वसंरक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत स्वसंरक्षणाच्या तंत्रांचे प्रात्यक्षिक सादर केले. या प्रात्यक्षिकाला उपस्थित विद्यार्थिनी व महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी रोटरी क्लब ऑफ पुणे संस्कृतीचे प्रेसिडेंट रो. मोहन टिळू, सेक्रेटरी रो. स्मिता कुलकर्णी, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर रो. संतोष परदेशी. तसेच इतर सभासद उपस्थित होते. एस.एन.डी.टी. कॉलेज ऑफ होम सायन्सच्या वतीने प्राचार्य गणेश चव्हाण, प्रा. अनुजा किणीकर व इतर प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते. मानसी फाऊंडेशनच्या वतीने संस्थेच्या अध्यक्ष सौ. मानसी ठाकूर उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुजा भिसे यांनी केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांचे मनोबल वाढवणे, आत्मविश्वास निर्माण करणे आणि स्वसंरक्षणाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवण्याचा संदेश देण्यात आला.



### संस्कार सुतार, मायरा वालेचा, अमायशा असीम यांना जिलबी रेस मध्ये सुवर्ण

■ पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धा ; स्टेट इक्वेस्ट्रियन असोसिएशनचा सहभाग

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेतर्फे आयोजित पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धेत चौथ्या दिवशी जिमखाना क्रीडाप्रकारातील जिलबी रेस मध्ये पिरंगुट येथील हेरिटेज स्कूलच्या संस्कार सुतार, दिग्विजय हॉर्स रायडिंग अकॅडमीच्या मायरा वालेचा आणि मुंबईतील ला फेन्स क्लबच्या अमायशा असीम यांनी आपापल्या गटात सुवर्णपदक पटकावले. स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा सुरु आहे. स्पर्धेत स्टेट इक्वेस्ट्रीयन असोसिएशनचा सहभाग आहे. जिलबी रेस प्रकारात ज्युनिअर गटात संस्कार सुतार (सुवर्ण), शौर्य निकाते (रौप्य), पूर्वजा खेडकर (ब्राँझ) यांनी यश मिळविले. तर, चिल्ड्रेन १ गटात मायरा वालेचा (सुवर्ण), स्वराज राजे (रौप्य), श्रावणी गायकवाड (ब्राँझ) यांनी पदकांची कमाई केली. चिल्ड्रेन २ गटात अमायशा असीम हिने सुवर्ण, स्वयंम संचेती याने रौप्य आणि अलंक्रिता राजपुरोहित हिने ब्राँझ पदक मिळविले. टेंट पेगिंग रिंग अँड सॉर्ड प्रकारात खुल्या गटात अश्वारूढ क्रीडा असोसिएशनच्या खेळाडूंनी निर्विवाद वर्चस्व राखले. अश्वारूढ क्रीडा असोसिएशनच्या गुरुप्रीत सिंग (सुवर्ण), रामबान सिंग (रौप्य) आणि अजय पाल सिंग (ब्राँझ) यांनी पदके मिळविली. ऑलिम्पिकमधील खेळाचा वेगळा प्रकार असलेल्या अश्वारोहण स्पर्धेचा हा थरार अनुभविण्याकरिता विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी देखील हजेरी लावली होती.

### प्रथमेश शेरलाने पटकावले विजेतेपद; पुणे महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धा

पुणे (दैनिक संध्या) : प्रथमेश शेरला याने पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित पुणे महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धेत खुल्या गटात नऊ फे-यांअखेर आठ गुणांसह विजेतेपद पटकावले. पुणे जिल्हा सर्कलच्या सहकार्य लाभलेली ही स्पर्धा लॉ कॉलेज रोडवरील भांडारकर इन्स्टिट्यूट येथे झाली. नवव्या फेरीपर्यंत ही स्पर्धा चुरशीची झाली. आठव्या फेरीअखेर प्रथमेशचे ७.५ गुण झाले होते. प्रथमेश अखेरच्या फेरीत पराभूत झाला, तर इतरांनाही विजेतेपदाची संधी होती. मात्र, नवव्या फेरीत पहिल्या पटावर प्रथमेशला पांढ-या मोहरांसह खेळणा-या श्रावणी उंडळेने बरोबरीत रोखले, तर पांढ-या मोहरांसह खेळणा-या अद्विक अगरवाललाही बरोबरीवरच समाधान मानावे लागले. त्यामुळे प्रथमेशचे आठ गुणांसह विजेतेपद निश्चित झाले. तिस-या पटावरील मिहीर सरवदे आणि सौरभ म्हामणे यांच्यातील डावही बरोबरीतच सुटला. त्यामुळे अद्विकने ७.५ गुणांसह दुसरे स्थान मिळवले. सौरभ म्हामणे, भूवन शितोळे, श्रावणी उंडळे, मिहीर सरवदे, आरुष डोळस यांचे प्रत्येकी समान सात गुण झाले. मात्र, टायब्रेकमध्ये सरस ठरल्याने सौरभने तिसरा क्रमांक पटकावला. पहिल्या क्रमाकाच्या विजेत्यास ११ हजार आणि करंडक, द्वितीय क्रमांक मिळविणा-यास नऊ हजार आणि तृतीय क्रमांक मिळविणा-यास सात हजार रुपये रोख देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी महाराष्ट्र चेस असोसिएशनचे सचिव निरंजन गोडबोले, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मनोज एरंडे, कॉसमॉस बँकेचे मिलिंद पोकळे, राजेंद्र कोंडे, प्रकाश कुंटे, महिला ग्रँड मास्टर मृणालिनी कुंटे, नगरसेवक सुनील पांडे लोहगावकर, वृषाली रिठे, चीफ अर्बिटर राजेंद्र शिदोरे उपस्थित होते.

### विशाल छुगेरा प्रॉपर्टीजतर्फे चॅनेल पार्टनर्स संमेलनाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : एन. ए. प्लॉटिंग क्षेत्रातील अग्रणी विशाल छुगेरा (व्ही. सी. प्रॉपर्टीज) पुढाकाराने विमाननगर येथील हॉटेल ग्रँड हयात येथे आयोजित चॅनेल पार्टनर्स संमेलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पुणे आणि परिसरात रिअल इस्टेट क्षेत्रात काम करणाऱ्या जवळपास ६०० व्यावसायिकांनी संमेलनाला हजेरी लावत व्ही. सी. प्रॉपर्टीजच्या बंगलो प्रकल्पांविषयी जाणून घेतले. कंपनीच्या आगामी प्रकल्पांची संकल्पना, त्यामागील नियोजन, तसेच ग्राहकांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि गुंतवणुकीच्या संधी याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. व्ही. सी. प्रॉपर्टीजचे चेअरमन विशाल छुगेरा, संचालक अमन छुगेरा व क्रिश छुगेरा, मार्गदर्शक व सल्लागार दर्शन चावला आणि किशन मिलानी उपस्थित होते. विशाल छुगेरा म्हणाले, "रिअल इस्टेट क्षेत्रात विश्वास, पारदर्शकता आणि गुणवत्तेला सर्वाधिक महत्त्व आहे. ग्राहकांच्या अपेक्षा ओळखून त्यानुसार नियोजनबद्ध प्रकल्प उभारणे ही आमची प्राथमिकता आहे. एन.ए. प्लॉटिंग आणि बंगलो प्रकल्पांच्या माध्यमातून आम्ही गुंतवणूकदार आणि घर खरेदीदारांना सुरक्षित व दीर्घकालीन मूल्य देण्याचा प्रयत्न करत आहोत.

## येऊदे कितीही अडचणीचं वारं... 'मी जिंकून घेईन सारं' नवी मालिका कलर्स मराठीवर

पुणे (दै. संध्या) :

■ भारती आचरेकर दिसणार मराठी मालिकेत पहिल्यांदाच !

■ पहा १६ मार्चपासून संध्या. ७ वा. आपल्या कलर्स मराठीवर




असं म्हणतात रक्ताच्या नात्यापेक्षा जोडली गेलेली नाती कधी कधी अत्यंत प्रिय असतात. ती आपल्यासाठी कुठलंही वादळ झेलून नेतात, आपल्यामागे खंबीरपणे उभी असतात आणि वेळ पडल्यास जीव ओवाळून टाकायला देखील मागं पुढे पाहत नाहीत. याच धाग्यावर आधारित नवी मालिका 'मी जिंकून घेईन सारं'. या नव्या मालिकेतील छवी देखील अशीच आहे. रक्ताचं नातं नसलं तरीदेखील छवीसाठी बाई- आजी म्हणजे देवासमान आहेत... त्यांच्यासाठी आणि राजगुरू परिवारासाठी छवी काहीही करू शकते. पण, या कुटुंबाचे रक्षण करताना तिच्यासमोर अनेक अडथळे येणार आहेत, त्यांना ती कशी सामोरी जाणार ? कशी ती हे सगळ निभावून नेणार? हे जाणून घेण्यासाठी नक्की पहा 'मी जिंकून घेईन सारं'. नुकताच या मालिकेचा प्रभावी प्रोमो आला असून, त्याने प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण केली आहे. या प्रोमोमधील सर्वात मोठं आकर्षण ठरते ते ज्येष्ठ अभिनेत्री भारती आचरेकर. त्या 'बाई-आजी' या अत्यंत वेगळ्या, ठाम आणि प्रभावी भूमिकेत प्रथमच मराठी मालिकेत दिसणार आहेत. कमी संवादांतूनच त्यांची स्क्रीन प्रेझेन्स, लाघवी व्यक्तिमत्त्व आणि करारी बाणा ठसठशीतपणे जाणवतो. अत्यंत गोड, सोज्वळ आणि प्रत्येकाचं मन जिंकून घेणारी छवीची भूमिका जान्हवी तांबट साकारणार आहे. शांभवीची भूमिका अमृता फडके, वत्सला- वंदना वाकनीस, अनिकेत - संचीत चौधरी, साकेत - अमित रेखी आणि बेबी आत्या - दिशा दानडे हे देखील महत्वपूर्ण भूमिकेत असणार आहेत. पहा येऊदे कितीही अडचणीचं वारं... मी जिंकून घेईन सारं १६ मार्चपासून संध्या. ७वा. आपल्या कलर्स मराठीवर.

राजगुरु परिवाराचा डोलारा बाई - आजी सांभाळत आहेत. त्या कुटुंबाच्या कर्ताधर्ता आहेत. जसं जिजाऊ शिवाजी महाराजांच्या मागे खंबीरपणे उभ्या होत्या, तसंच बाईजी आपल्या मुलाच्या पाठीशी उभ्या राहिल्या. एका अपघातात मुलगा आणि सून अकाली गेले. तेव्हापासून बाई - आजींनी साकेत आणि अनिकेत या आपल्या नातवंडांना आईची माया दिली. आणि याच राजगुरू परिवारात लहानाची मोठी झाली आपली छवी. सुंदर, सुशील या पारंपरिक चौकटीत न बसणारी ही अपूर्ण छवी...स्वभावाने बडबडी, थोडीशी अति उत्साही; पण तितकीच हुशार. प्रत्येक नात्यात मनापासून जीव ओतणारी. बाई - आजींचा रुबाब, छवीची त्यांच्यावर असलेली निष्ठा क्षणोक्षणी प्रकर्षाने दिसून येते. एकीकडे बाई - आजी आणि छवीचं सावलीसारखं नातं. पण, या परिवारावर वाकडी नजर आहे ती म्हणजे अत्यंत चाणाक्ष, धूर्त, अप्पलपोटी आणि उलट्या काळजाची मुलगी शांभवी हिची. हिच्या मनात साचलेला भूतकाळ आणि सूडाची भावना हे राजगुरू परिवारावर नक्कीच कुठलं तरी संकट घेऊन येणार. राजगुरू परिवारात येऊन त्यांना उध्वस्त करण्याचा शांभवीचा डाव छवीला समजेल? कितीही संकटं आली तरी छवी ती खंबीरपणे कशी निभावून नेणार? शांभवीच्या सूडामागचं नेमकं कारण काय आहे? छवी राजगुरू कुटुंबाचं रक्षण करताना कोणती किंमत मोजणार? हे बघणे उत्सुकतेचे असणार आहे.

बाई-आजी ठामपणे तिच्या पाठीशी उभी राहताना दिसणार आहे. प्रोमोमध्ये बाई-आजी आणि छवीमधील अतूट विश्वासाचं नातं ठळकपणे दिसून येतं. आयुष्याच्या निर्णायक क्षणी बाई-आजी प्रत्येक निर्णयासाठी छवीच्या ठाम व्यक्तिमत्त्वावर आणि विचारांवर विसंबून असल्याचं जाणवतं. छवीवर असलेला बाई-आजींचा अढळ विश्वास आणि तिच्याकडून मिळणारा आधार हा या नात्याचा गाभा आहे. ज्यांच्यावर प्रेक्षक मनापासून प्रेम करतात अश्या आपल्या लाडक्या भारती आचरेकर या मालिकेविषयी बोलताना म्हणाल्या, 'बाई-आजी' ही केवळ परंपरागत चौकटीतली आजी नाही, तर उदारमतवादी, मोकळ्या विचारांची आजी आहे. काळानुसार बदल स्वीकारणारी, आजच्या पिढीच्या विचारांशी सहज जुळवून घेणारी आणि स्निकर घालून आत्मविश्वासाने वावरणारी ही 'कूल' आजी कायम हसतमुख व आनंदी असते. नातवंडांना समजून घेणारी, त्यांच्याशी मैत्रीपूर्ण नातं जपणारी अशी ती स्त्री आहे.

## 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धेला स्थगिती आणि मनाई आदेश देण्याची मागणी

पुणे (दै. संध्या) :




पारंपरिक भारतीय मातीवरील कुस्ती (मिट्टी-कुस्ती) आणि तिच्या ऐतिहासिक किताबांचे संरक्षण करण्यासाठी इंडियन स्टाईल रेसलिंग असोसिएशन ऑफ इंडिया (ISWAI) कटिबद्ध आहे. 'हिंद केसरी', 'भारत केसरी' आणि 'रुस्तम-ए-हिंद','महाराष्ट्र केसरी'या प्रतिष्ठित किताबांच्या परंपरेचे जतन करण्यासाठी आवश्यक कायदेशीर पावले उचलण्यात आली असल्याचे सांगत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पुण्यात होणाऱ्या 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धेला स्थगिती आणि मनाई आदेश देण्याची मागणी न्यायालयाकडे केल्याचे पत्रकार परिषदेत सांगितले.

यावेळी इंडियन स्टाईल रेसलिंग असोसिएशन ऑफ इंडिया (ISWAI) सरचिटणीस जनरल गौरव रोशन लाल सचदेवा,महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघ सचिव मोहन खोपडे, पै.ज्ञानसिंह शेरावत (ओलंपियन,अध्यक्ष तांत्रिक समिती),पै.नितीन बारणे (अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघ), पै.पोपट नलावडे (राष्ट्रीय खेळाडू),महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघ कार्याध्यक्ष प्रा.नितीन शिंदे आणि पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, १९५८ पासून कार्यरत असलेल्या ISWAI कडून देशभरातील कुस्तीपटूंना व्यासपीठ उपलब्ध करून देत पारंपरिक भारतीय कुस्तीचा वारसा जपण्याचे काम केले जात आहे. या ऐतिहासिक किताबांचे नाव व प्रतिष्ठा कायम राखण्यासाठी त्यांची ट्रेडमार्क नोंदणीही करण्यात आली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, भारतीय पारंपरिक कुस्तीच्या प्रसारासाठी त्यांच्या कार्याला United World Wrestling कडूनही मान्यता मिळाली आहे. या संस्थेने ISWAI ही भारतातील पारंपरिक कुस्तीचे प्रतिनिधित्व करणारी अधिकृत राष्ट्रीय संघटना आहे. दरम्यान, महाराष्ट्र कुस्ती संघटना (Wrestling Association of Maharashtra) यांनी ISWAI आयोजित स्पर्धा व किताबांना "बोगस" म्हटल्याचा आरोप संघटनेने फेटाळून लावला आहे. अशा विधानांमुळे कुस्ती समुदायात संभ्रम निर्माण होत असल्याचेही पदाधिकाऱ्यांनी सांगितले. यासंदर्भात ISWAI चे सरचिटणीस गौरव सचदेवा आणि महाराष्ट्र राज्य भारतीय शैली कुस्ती संघाचे सचिव मोहन खोपडे यांनी मिळून प्रस्तावित 'महाराष्ट्र केसरी' स्पर्धेविरोधात पुणे जिल्हा न्यायालय येथे स्थगिती व मनाई आदेशासाठी अर्ज दाखल केला आहे. ही स्पर्धा १८ ते २२ मार्च २०२६ दरम्यान वाघोली येथे आयोजित करण्यात आली आहे.

## महावितरण ग्राहक मंचातर्फे ग्राहक दिनाचे आयोजन




पुणे (दै. संध्या) :

कसबा पेठेतील कुंभारवाडा शेजारी असलेल्या महावितरणच्या ग्राहक तक्रार निवारण मंचातर्फे मंगळवारी (दि. १७) जागतिक ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले असून, वीज ग्राहकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन ग्राहक तक्रार निवारण मंचाने केले आहे. १५ मार्च हा जागतिक ग्राहक दिन असून रविवारी सुटी आल्याने मंचातर्फे मंगळवारी ग्राहक दिन साजरा केला जाणार आहे. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य नियामक आयोगाच्या विनियम २०२० व २०२१ अंतर्गत वीज ग्राहकांचे हक्क व तक्रार निवारण या संदर्भात मार्गदर्शन केले जाणार आहे. कार्यक्रमाची वेळ सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत हा कार्यक्रम होणार असून, जास्तीत जास्त वीजग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन मंचाचे अध्यक्ष महेंद्र दिवाकर व सदस्य-सचिव अपर्णा मुनशेट्टीवार यांनी केले आहे.

## मुलीशी बोलण्याच्या कारणावरून तरुणाचा खून; ६ आरोपींना अटक

पुणे (दै. संध्या) :

मुलीसमवेत बोलण्याच्या कारणावरून संतप्त नातेवाइकांनी तरुणाला इमारतीत बोलावून दांडक्याने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना कोथरूड परिसरात शनिवारी (ता. १४) रात्री घडली. गंभीर जखमी झालेल्या या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी कोथरूड पोलिसांनी दहा जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. त्यापैकी अटक केलेल्या सहा आरोपींना न्यायालयाने १७ मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे. नागेश संजय जाधव (वय २३, रा. जुनी वडारवाडी, मंजाळकर चौक, शिवाजीनगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. याबाबत त्याची आई सुरेखा संजय जाधव (वय ४५) यांनी कोथरूड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार वृषाली अनिल शिंदे, सुनिता सुनिल शिंदे, जयश्री लक्ष्मण शिंदे, तुळशी योगेश शिंदे, गंगा संजय पवार, अनिल श्यामराव शिंदे (सर्व रा. मेगा सिटी, कोथरूड) या संशयित आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर, इतर चार संशयितांचा शोध घेण्यात येत आहे. न्यायालयाने सहा आरोपींना १७ मार्चपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे, अशी माहिती पोलिस निरीक्षक अनिल माने यांनी दिली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नागेश जाधव हा शिवाजीनगर येथील एका खासगी कार्यालयात काम करत होता. तो एका मुलीशी बोलत-भेटत होता. मुलीच्या नातेवाइकांचा त्याला विरोध होता. शनिवारी (ता. १४) सायंकाळी सातच्या सुमारास आरोपींनी नागेशला मोबाइलवर संपर्क साधून पौड फाटा येथील मेगा सिटी इमारतीत बोलावून घेतले.

## उपमहापौर परशुराम वाडेकर यांना 'दि ग्रेट फकीरा' पुरस्कार प्रदान

पुणे (दै. संध्या) :



महाराष्ट्र लहुजी आर्मी व दयाशांती फाउंडेशन यांच्या वतीने देण्यात येणारा यंदाचा 'दि ग्रेट फकीरा' पुरस्कार पुणे महानगरपालिकेचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांना प्रदान करण्यात आला. ॲड. महेश सकट यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे मुख्य आयोजक विशाल सकट व बापू खोडे उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर म्हणाले की, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेली 'फकीरा' ही कादंबरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अर्पण केली होती. या कादंबरीत बाबासाहेबांबद्दल लिहिलेले "जग बदल घालुनी घाव, सांगून गेले माझे भिमराव" हे गीत आजही अजरामर आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या या कादंबरीला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कारही मिळाला असून या पुस्तकाची विक्री लाखोंच्या घरात झाली आहे. ही कादंबरी दलित, आदिवासी, गोरगरीब तसेच भटके-विमुक्त समाजाच्या जीवनावर आधारित असून ब्रिटिश सत्तेविरोधात दलितांच्या वेदना मांडणारे क्रांतिकारी साहित्य आहे. या कादंबरीतील 'फकीरा' या नायकाप्रमाणेच समाजासाठी कार्य करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे वाडेकर यांनी सांगितले. तसेच या नावाचा पुरस्कार दिल्याबद्दल आयोजकांचे त्यांनी मनापासून आभार मानले.

कार्यक्रमादरम्यान उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना यूपीएससी-एमपीएससी अभ्यासक्रमाची पुस्तके वितरित करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुमित रणदिवे यांनी केले.

## शैक्षणिक संशोधन औद्योगिक तंत्रज्ञानात बदलण्याची गरज – डॉ. दत्तात्रय जाधव

पुणे (दै. संध्या) :




कीस्टोन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग, उरळी देवाची (पुणे) येथे "INMEC-2026" (Interdisciplinary Advances in Mechanical, Electronics and Computer Engineering) या आंतरराष्ट्रीय परिषदेचे १४ व १५ मार्च रोजी यशस्वी आयोजन करण्यात आले. उद्योग क्षेत्रातील ग्लोबमाईंड टेक्नॉलॉजी तसेच विज्ञान-तंत्रज्ञान प्रकाशन क्षेत्रातील अग्रगण्य साईटेक प्रेस व स्प्रिन्जर नेचर यांच्या संयुक्त भागीदारीत ही परिषद पार पडली. परिषदेच्या उद्घाटन समारंभासाठी तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे येथील सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच सॅमसन टेकनीनिशे लॅब्सचे मुख्य डेटा सायंटिस्ट डॉ. प्रदीप बिलूलकर सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. महाराष्ट्र रत्न आणि कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील तज्ज्ञ अब्दुल्ला पठाण हे मुख्य वक्ते म्हणून लाभले.

यावेळी बोलताना डॉ. जाधव म्हणाले की, प्राध्यापकांनी शैक्षणिक संशोधन औद्योगिक तंत्रज्ञानात रूपांतरित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे गरजेचे आहे. संशोधनाचे प्रत्यक्ष उद्योग क्षेत्रात रूपांतर झाल्यास देशाच्या तांत्रिक प्रगतीला मोठी चालना मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. तसेच संशोधक विद्यार्थ्यांसाठी परदेशात उच्च शिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांची माहितीही त्यांनी दिली.

डॉ. प्रदीप बिलूलकर यांनी उपस्थितांना संशोधनाचा पंचसूत्री कार्यक्रम समजावून सांगत संशोधनातील गुणवत्ता आणि नावीन्याचे महत्त्व अधोरेखित केले.

उद्घाटन समारंभाला विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक आणि संशोधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिषद ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही माध्यमांत आयोजित करण्यात आली होती. देश-विदेशातून ६०० हून अधिक शोधनिबंध प्राप्त झाले असून त्यापैकी १९७ निवडक शोधनिबंधांचे विविध तांत्रिक सत्रांमध्ये सादरीकरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. अर्चना काळे यांनी स्वागतपर भाषण केले. परिषदेचे Convener डॉ. परीक्षित महाले यांनी आपल्या भाषणात देश-विदेशातील नवीन तांत्रिक संकल्पना आणि संशोधनाची वाढती गरज यावर प्रकाश टाकला, तर डॉ. तुषार भोईटे यांनी परिषदेच्या आयोजनाची सविस्तर माहिती दिली.

ही परिषद संस्थापक संचालक प्रा. यशोधन सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्राचार्य डॉ. संदीप कदम यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आली. परिषदेच्या आयोजनासाठी ग्लोबमाईंडचे व्यवस्थापकीय संचालक प्रवीण जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. बाळाजी बोडखे, संगणक विभागप्रमुख प्रा. सागर राजेभोसले आणि डॉ. वीणा कदम यांच्या नियोजनाचे विशेष कौतुक करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात प्रा. सोमण यांनी आयोजक व सहभागी संशोधकांना शुभेच्छा देत अशा प्रकारच्या व्यासपीठासाठी संस्था कायम कटिबद्ध असल्याचे नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मीनाक्षी देवकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सागर राजेभोसले यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जेएसपीएम विद्यापीठात भव्य रक्तदान शिबिर; 750 रक्तपिशव्या संकलित

पुणे (दैनिक संध्या) : जेएसपीएम ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे संस्थापक सचिव तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी आरोग्यमंत्री प्रा. (डॉ.) तानाजी सावंत यांच्या वाढदिवसानिमित्त जेएसपीएम विद्यापीठ, पुणे येथे दिनांक १४ मार्च २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला विद्यापीठातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात रक्तदान केले. या रक्तदान शिबिराला मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये जेएसपीएम विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विशाल चौधरी, जेएसपीएम वाघोली कॅम्पसचे कॅम्पस डायरेक्टर डॉ. वसंत बुगडे, विज्ञान व तंत्रज्ञान संकुलाचे अधिष्ठाता डॉ. आर. एस. देशपांडे, आरोग्य विज्ञान संकुलाचे अधिष्ठाता डॉ. सागर वानखेडे, व्यवसाय व्यवस्थापन व वाणिज्य संकुलाच्या अधिष्ठाता डॉ. प्रभा सिंह, तसेच शिक्षण व मानवविद्या संकुलाच्या अधिष्ठाता श्रीमती अर्पिता कसवा यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी समाजाप्रती असलेली आपली बांधिलकी जपत उत्साहाने रक्तदान केले. या उपक्रमातून एकूण ७५० रक्तपिशव्या संकलित करण्यात आल्या. या रक्तदानामुळे अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, समाजसेवा हीच खरी मानवसेवा असून रक्तदानासारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ होते. जेएसपीएम विद्यापीठ समाजहिताच्या विविध उपक्रमांद्वारे सामाजिक बांधिलकी जपत असल्याचेही त्यांनी नमूद केले. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठ प्रशासन, प्राध्यापक, कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले.

### राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर



■ अमेरिकेतील 'आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर' पुरस्कार

मुंबई (दैनिक संध्या) : राज्याच्या ऊर्जा, महिला व बालविकास, सार्वजनिक आरोग्य आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांना अमेरिकेतील U.S. India SME Council, Washington DC तर्फे 'आउटस्टँडिंग व्हिजनरी लीडर अँड ट्रू चेंजमेकर' हा प्रतिष्ठेचा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार 14 मार्च 2026 रोजी जाहीर करण्यात आला असून त्यांचा सत्कार 25 मार्च 2026 रोजी सकाळी 10 वाजता नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये आयोजित विशेष समारंभात करण्यात येणार आहे. राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी महाराष्ट्रात विशेषतः परभणी जिल्ह्यात ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवले आहेत. महिला उद्योजकांना प्रोत्साहन, लखपती दीदी योजना, ग्रामीण महिलांसाठी सिल्क अँड मिल्क उपक्रम, तसेच एकल महिला सशक्तीकरण अभियान यांसारख्या योजनांद्वारे महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांना हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आल्याची माहिती परिषदेत देण्यात आली आहे. अमेरिका-भारत आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करण्यासाठी कार्यरत असलेली U.S. India SME Council ही संस्था लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देणे, नाविन्यपूर्ण उद्योजकता वाढविणे तसेच पायाभूत सुविधा, ऊर्जा, शाश्वत विकास, आरोग्य आणि ग्रामीण विकास अशा विविध क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढविण्यासाठी काम करते.



### बाबूरावजींनी अनेकांना प्रेरणा दिली – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर (दैनिक संध्या) : विदर्भाच्या सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात बाबुरावजी तिडके यांनी उत्तम काम करून अनेकांना प्रेरणा दिली, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ज्येष्ठ नेते बाबुरावजी तिडके यांच्या 85 व्या वाढदिवसानिमित्त हॉटेल सेंटर पॉइंट येथे आयोजित अभीष्टचिंतन सोहळ्यात मुख्यमंत्री बोलत होते. नागपूर जिल्ह्यातील राजकारणाला दिशा देण्याचे काम तिडके यांनी केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. यावेळी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार विकास ठाकरे, आमदार समीर मेघे, माजी केंद्रीय मंत्री विलास मुत्तेमवार, माजी खासदार दत्ता मेघे, माजी मंत्री रणजीत देशमुख, अनिल देशमुख, विनोद गुडधे पाटील, राजेंद्र मुळक, माजी आमदार अशोक धवड, अविनाश वरजुकर उपस्थित होते.


### ग्रामपंचायत आंबोडी, ता. पुरंदर, जि. पुणे

**B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२५/२६**

ग्रामपंचायत आंबोडी, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत आंबोडी ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक १६/०३/२०२५ ते दिनांक २३/०३/२०२५ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व दिनांक १६/०३/२०२५ ते दिनांक २३/०३/२०२५ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यत पोस्टाने समक्ष ग्रामपंचायत मद्ये स्वीकारले जातील. सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी /ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | आंबोडी येथे पाऊस पाणी संकलन यंत्रणा करणे. | १४९९९८/- | दिनांक १६/०३/२०२५ ते दिनांक २३/०३/२०२५ | २३६/- | १५००/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत आंबोडी PDCC बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५००००१७२ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३)या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत आंबोडी ग्रामनिधी खाते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा सासवड खाते क्र. ००६००२५००००१७२ च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश /डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्या नंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत आंबोडी यांनी राखुन ठेवला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशासक
ग्रामपंचायत आंबोडी, ता. पुरंदर, जि. पुणे


# मिशन आर्थ्रायटिस इंडियातर्फे पुण्यात राष्ट्रीय रुग्ण परिषद आयोजित

पुणे (दै. संध्या) :

मिशन आर्थ्रायटिस इंडिया (माई ) तर्फे अस्थी व सांधे आरोग्य या विषयावर राष्ट्रीय रुग्ण परिषद आयोजित करण्यात आली . द पूना क्लब, कॅम्प येथे आयोजित या परिषदेत रुग्ण, त्यांचे पालक-कुटुंबीय (केअरगिव्हर्स) आणि डॉक्टर्स मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. जागरूकता, शिक्षण आणि रुग्ण सक्षमीकरणासाठी हा दिवस समर्पित करण्यात आला होता. या परिषदेला प्रमुख पाहुण्या म्हणून एंडोक्रायनोलॉजिस्ट डॉ. वैशाली देशमुख उपस्थित होत्या. त्यांनी सांधेदुखी आणि संबंधित



विकार टाळण्यासाठी शारीरिक व मानसिक आरोग्य तसेच योग्य जीवनशैली आणि नियंत्रित वजन व्यवस्थापनाचे महत्त्व अधोरेखित केले. या परिषदेत तज्ज्ञांची मार्गदर्शक व्याख्यानेही झाली. यामध्ये ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट डॉ. नचिकेत कुलकर्णी, सीआरडी चे संचालक व मुख्य ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट डॉ. अरविंद चोप्रा, टिळक आयुर्वेद महाविद्यालयातील द्रव्यगुण विभागप्रमुख व प्राध्यापक डॉ. अपूर्वा एम. संगोराम आणि माईर्स च्या फिजिओथेरपी महाविद्यालयाच्या प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. रवींदर कौर यांचा समावेश होता.

माई च्या अध्यक्षा दीपा मेहता यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती देत संधिवातग्रस्त रुग्णांना मदत करण्यासाठी संस्थेने केलेल्या कार्याचा आढावा घेतला.

माई च्या सचिव श्रीमती श्वेता कुलकर्णी यांनी स्वागतपर भाषण केले. त्यानंतर माई स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

तज्ज्ञांच्या व्याख्यानांमध्ये अस्थी व सांधे आरोग्य, निरोगी सांध्यांसाठी योग्य शरीरबांधा व एर्गोनॉमिक्स, तसेच संधिवात नियंत्रणासाठी पारंपरिक भारतीय आहार व पोषण यांचे महत्त्व या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे तीन प्रतिष्ठित पुरस्कारांचे वितरण. स्व. श्री. पी. सी. नहार ऑरेशन पुरस्कार डॉ. नचिकेत कुलकर्णी यांना, स्व. श्री. हरिभाऊ राठीजी वात विरुद्ध योद्धा पुरस्कार श्रीमती राणी परसनीस यांना, तर सीआरडी वात विरुद्ध पुरस्कार श्री. अरविंद जगताप यांना प्रदान करण्यात आला.

यानंतर आयोजित ओपन फोरम सत्रात रुग्णांनी डॉक्टरांशी थेट संवाद साधत आपले अनुभव मांडले आणि मार्गदर्शन घेतले.

सौर इनगॉट आणि वेफर उत्पादन संकुल असलेले भारतातील नागपूर प्रमुख केंद्र

नागपूर (दै. संध्या) :

सौरऊर्जा निर्मितीमध्ये जागतिक स्तरावर महत्त्वाची भूमिका असलेल्या एकात्मिक इनगॉट व वेफर उत्पादन संकुल नागपूर येथे वारी एनर्जीच्या माध्यमातून उभारण्यात येत आहे. भारतातील सर्वात मोठी १० गिगावॅट क्षमता असलेला हा प्रकल्प सौर क्षेत्रासाठी अधिक स्थिर देशांतर्गत पुरवठा यंत्रणा निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पामुळे सौरऊर्जा निर्मितीचे प्रमुख केंद्र म्हणून नागपूरची नवी ओळख निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अतिरिक्त बुटीबोरी औद्योगिक क्षेत्रात वारी एनर्जीज् लिमीटेड या आघाडीच्या उद्योग समूहातर्फे भारतातील सर्वात मोठ्या 10 गिगावॅट एकात्मिक इनगॉट व वेफर उत्पादन प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले, याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

# नागपूरमध्ये १० गिगावॅट क्षमतेचा सौर इनगॉट-वेफर प्लांट

नागपूर (दै. संध्या) :

शुद्ध ऊर्जा क्षेत्रातील आघाडीची कंपनी वारी एनर्जीज लिमिटेडने नागपूरमधील बुटीबोरी येथे भारतातील सर्वात मोठ्या १० गिगावॅट क्षमतेच्या एकात्मिक सौर इनगॉट व वेफर उत्पादन प्रकल्पाची उभारणी करण्याची घोषणा केली. या प्रकल्पाचे भूमिपूजन समारंभ उत्साहात पार पडले. सुमारे ३०० एकर जागेवर आणि अंदाजे ६,२०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत हा

**वारी एनर्जीजची घोषणा**

प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पामध्ये सौर इनगॉट्स आणि वेफर्ससाठी प्रत्येकी १० गिगावॅट उत्पादन क्षमता असेल. त्यामुळे भारतातील सौर उत्पादन क्षेत्रात हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

हा प्रकल्प देशातील सौर उद्योगासाठी स्थिर देशांतर्गत पुरवठा साखळी निर्माण करण्यास मदत करणार असून आयातित साहित्यातील अवलंबन कमी करण्यासही हातभार लावणार आहे. प्रकल्प सुरू झाल्यानंतर ८,००० हून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

या भूमिपूजन समारंभाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. वारी एनर्जीजचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हितेश दोशी यांनी सांगितले की, भारताच्या शुद्ध ऊर्जा संक्रमणाला बळकटी देण्यासाठी देशांतर्गत सौर उत्पादन क्षमता वाढवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. नागपूरमधील हा प्रकल्प 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमाला चालना देत सौर पुरवठा साखळी अधिक मजबूत करेल.

भारत नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत असताना, हा प्रकल्प देशाच्या दीर्घकालीन ऊर्जा स्वावलंबन आणि शुद्ध ऊर्जा उद्दिष्टांसाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुलातील ८६४ पुनर्वसन सदनिकांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते १६ मार्च रोजी वितरण

**पुनर्वसन सदनिकांमध्ये निवृत्त पोलीस, त्यांचे वारस व कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यांच्या ४२३ सदनिकांचा समावेश**

मुंबई (दै. संध्या) :

■ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती

आशियातील नागरी पुनरुत्थानाच्या सर्वात मोठ्या बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील नायगाव येथील प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात पूर्ण झालेल्या ५ पुनर्वसन इमारतींतील एकूण ८६४ पात्र रहिवाशांना प्रातिनिधिक स्वरुपात सदनिकांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर, नरीमन पॉइंट येथे सोमवार, दि. १६ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता करण्यात येणार आहे. यामध्ये ४२३ सदनिका नागरिकांच्या सुरक्षेसाठी तत्पर असलेल्या पोलीस विभागातील निवृत्त पोलीस, त्यांचे वारस व कार्यरत पोलीस कर्मचाऱ्यांकरिता आहेत. म्हाडाच्या मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत राज्य शासनाच्या अत्यंत महत्वाकांक्षी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाची अंमलबजावणी केली जात आहे. या प्रकल्पांतर्गत नायगाव येथील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर बीडीडी संकुल' असे नामकरण करण्यात आले आहे. नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पात दोन पुनर्वसन इमारतीत



एकूण २० टॉवर बांधण्यात येणार आहेत. यात पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याअंतर्गत पुनर्वसन इमारत क्रमांक ०१ मधील एकूण ८ टॉवर्स पैकी ५ टॉवर्समधील ८६४ सदनिकांच्या वितरण कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, कौशल्य विकास, उद्योजकता व नावीन्यता मंत्री तथा मुंबई उपनगराचे सह पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा मुंबई उपनगराचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या ६.४५ हेक्टर जागेवर तळ अधिक ३ मजल्यांच्या ४२ चाळींमध्ये ३३४४ भाडेकरू वास्तव्यास आहेत. दोन टप्प्यात राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पात २३ मजल्यांच्या २० पुनर्वसन इमारती उभारल्या जात आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये नायगाव बीडीडी चाळीतील प्लॉट 'ब' मधील १४०१ रहिवाश्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. यामध्ये ८ पैकी ५ पुनर्वसन इमारतींतील ८६४ सदनिकांच्या चाव्या मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते प्रदान केल्या जात आहेत. उर्वरित ५३७ सदनिकांचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून एप्रिल २०२६ मध्ये हे काम पूर्ण होणार आहे. हा प्रकल्प राबवितांना एकूण भूखंडापैकी सुमारे ६५ टक्के जागेचा वापर पुनर्वसनासाठी करण्यात आला आहे. तसेच प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील प्लॉट 'अ' मधील १९ चाळींच्या जागेवर प्रस्तावित १२ पुनर्वसन इमारतींपैकी ३ पुनर्वसन इमारतींचे बांधकाम प्रगतिपथावर आहे. पहिल्या टप्प्यांतर्गत चाळींतील रहिवाशांचे तात्पुरत्या संक्रमण शिबिरात स्थलांतरण करण्यात आले आहे. तसेच चाळीतील रहिवाशांना भाडे किंवा संक्रमण गाळे यापैकी पर्याय निवडण्याचा विकल्प उपलब्ध करून देण्यात आला. निवासी व अनिवासी गाळेधारकास २५ हजार रुपये प्रति महिना ११ महिन्यांचे आगाऊ भाडे देण्यात येत आहे. सुमारे दोन ते तीन पिढ्यांपासून १६० चौरस फुटाच्या खोलीत राहणाऱ्या पात्र रहिवाशांना म्हाडामार्फत पुनर्वसन इमारतीत ५०० चौरस फूट चटई क्षेत्रफळाची अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त २ बीएचके स्वरुपातील सदनिका मालकी तत्त्वावर विनामुल्य वितरित केली जाणार आहे. पुनर्वसन सदनिकेत व्हिट्रीफाईड टाईल, ॲल्युमिनियम फ्रेमच्या खिडक्या, ग्रानाईट स्वयंपाकाचा ओटा, अग्निरोधक यंत्रणा यासह ब्रांडेड प्लंबिंग फिटिंग्स आदी सारख्या अनेक सुविधा देण्यात आल्या असून भूकंप रोधक तंत्रज्ञानवर आधारित उभारलेल्या या इमारतींमध्ये दोन पॅसेंजर लिफ्ट, एक फायर लिफ्ट, सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक मजल्यावर सीसीटीव्ही यंत्रणा देखील बसविण्यात आली आहे. या प्रकल्पांतर्गत ३ मजल्यांचे बेसमेंट पार्किंग, स्टील्ट एरिया आणि प्रशस्त जिने आहेत.

# पत्रकारांनी 'एआय'कडे कौशल्यवृद्धीची संधी म्हणून पहावे




मुंबई (दै. संध्या) :

■ प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह

■ मुंबई मराठी पत्रकार संघाच्या 'एआय परिषदे'त मार्गदर्शन

■ एआयच्या युगातही पत्रकारितेची विश्वासार्हता अधिक महत्त्वाची

पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर झपाट्याने वाढत असला तरी एआयला वास्तव समजण्याची क्षमता नसते, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे. सत्य शोधण्याची जबाबदारी आणि समाजाचा विश्वास हे पत्रकारितेचे मूलभूत बळ असल्यामुळे बदलत्या तंत्रज्ञानाच्या काळातही पत्रकारितेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरणार आहे, असे मत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी व्यक्त केले. पत्रकारांनी एआयकडे धोका म्हणून न पाहता कौशल्यवृद्धीची संधी म्हणून पाहावे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित 'एआय परिषद २०२६'चे उद्घाटन महासंचालक सिंह यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी एआयमुळे पत्रकारितेच्या क्षेत्रात होणारे बदल, संधी आणि आव्हाने यावर सविस्तर भाष्य केले. यावेळी संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, राजेंद्र हुंजे, विश्वस्त देवदास मटाले, अजय वैद्य, कार्यवाह शैलेंद्र शिर्के आदी यावेळी उपस्थित होते.

प्रधान सचिव सिंह म्हणाले, मानव इतिहासात ज्ञान लोकांपर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया छपाई तंत्रज्ञानाच्या शोधानंतर मोठ्या प्रमाणावर बदलली. पूर्वी ज्ञान काही विशिष्ट गटांपुरते मर्यादित होते; मात्र छपाईमुळे ते सर्वसामान्यांपर्यंत पोहोचले. त्यानंतर प्रसारमाध्यमांचा विकास झाला. दूरदर्शन सुरू झाले तेव्हा वृत्तपत्रांना धोका वाटत होता; डिजिटल माध्यमे आली तेव्हा टीव्हीला धोका वाटू लागला. मात्र, या सर्व बदलांनंतरही वृत्तपत्रांनी आपले अस्तित्व टिकवले. भविष्यातही पत्रकारिता टिकेल, मात्र जे काही काम स्वयंचलित होऊ शकते ते एआयमुळे स्वयंचलित होणार हेही वास्तव आहे, असे त्यांनी नमूद केले.

# सुयोग वडकेने पटकावले विजेतपद; १९ वर्षांखालील गटात मारली बाजी

पुणे (दै. संध्या) :

सुयोग वडके याने पुणे महानगरपालिकेच्या वतीने आयोजित पुणे महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धेत १९ वर्षांखालील गटात सात फेऱ्यांअखेर ६.५ गुणांसह विजेतेपद पटकावले.

पुणे जिल्हा सर्कलच्या सहकार्य लाभलेली ही स्पर्धा लॉ कॉलेज रोडवरील भांडारकर इन्स्टिट्यूट येथे झाली. सातव्या आणि अखेरच्या फेरीत पहिल्या पटावर पांढऱ्या मोहरांसह खेळताना सुयोगने युवराज बहेरानीवर मात करून विजेतेपद निश्चित केले. मानसी टिळेकर ५.५ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर राहिली. गनक देशपांडे आणि आर्ष कुलकर्णी यांचे समान पाच गुण झाले. मात्र, टायब्रेकमध्ये सरस ठरल्याने गनकने तिसरा क्रमांक निश्चित केला. १७ वर्षांखालील गटात सातव्या फेरीअखेर मार्मिक शाह, अनुष्का कुतवळ, अक्षज पाटील, अर्णव कदम यांचे समान ५.५ गुण झाले होते. टायब्रेकमध्ये सरस ठरल्याने मार्मिक अव्वल, अनुष्का दुसरी, तर अक्षज तिसऱ्या क्रमांकावर राहिला. १५ वर्षांखालील गटात निहीरा कौलने ७.५ गुणांसह विजेतेपद पटकावले. सई पाटीलने (६.५) दुसरा, तर गर्व देवनानी (६) तिसरा क्रमांक मिळवला. १३ वर्षांखालील गटात अविरत चौहानने आठ गुणांसह विजेतेपद पटकावले. वेदान्त काळे (६) आणि अभिज्ञ शेळके (६) अनुक्रमे दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर राहिले. नऊ वर्षांखालील गटात प्रितिका नंदीने ६.५ गुणांसह, तर सात वर्षांखालील गटात सक्षम साहाने ७.५ गुणांसह विजेतेपद निश्चित केले. प्रत्येक गटातील पहिल्या क्रमाकाच्या विजेत्यास ११ हजार आणि करंडक, द्वितीय क्रमांक मिळविणा-यास नऊ हजार आणि तृतीय क्रमांक मिळविणा-यास सात हजार रुपये रोख देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या पारितोषिक वितरणप्रसंगी



महाराष्ट्र चेस असोसिएशनचे सचिव निरंजन गोडबोले, शिवछत्रपती पुरस्कार विजेते मनोज एरंडे, मिलिंद पोखरे, राजेंद्र कोंडे, प्रकाश कुंटे, मृणालिनी कुंटे, नगरसेवक सुनील पांडे लोहगावकर, वृषाली रिठे उपस्थित होते. निकाल :

१९ वर्षांखालील मुले - सातवी फेरी - सुयोग वडके (६.५) वि. वि. युवराज बहेरानी (४), गनक देशपांडे (५) पराभूत वि. आर्ष कुलकर्णी (५), वंशिका घळे (४) पराभूत वि. मानसी टिळेकर (५.५), ऋग्वेद सरगर (४) पराभूत वि. वेदान्त कुरुम (४.५), राजवीर यादव (३) पराभूत वि. प्रारब्ध थोरात (४), सृष्टी भेंकी (२) पराभूत वि. पार्थी विंचवेकर (३).

१७ वर्षांखालील मुले - अर्णव कदम (५.५) बरोबरी वि. अक्षज पाटील (५.५), अनुष्का कुतवळ (५.५) बरोबरी वि. प्रतिती खंडेलवाल (४.५), मार्मिक शाह (५.५) वि. वि. अथर्व जावळी (४), लक्ष्य वाधवा (४) बरोबरी वि. अनुष्का गांधी (४.५), सर्वेश धुमाळ (३) पराभूत वि. विराज सराफ (४.५), अदिती कुलकर्णी (३.५) बरोबरी वि. श्रेयस पाटील (३.५), महेर शाह (२.५) पराभूत वि. यश खोडे (४), क्रिशिल शाह (४) वि. वि. आरुष फाकतकर (२).

आठवी फेरी - १५ वर्षांखालील गट - ओजस नेवपुरकर (५) पराभूत वि. निहिरा कौल (७.५), ओवी पावडे (५.५) बरोबरी वि. सई पाटील (६.५), ईशिता तापसे (५) पराभूत वि. देवनानी गर्व (६), लाव्या अगरवाल (४.५) पराभूत वि. सिद्धान्त साळुंके (६), अर्जुन सुपेकर (५.५) वि. वि. अथर्व बेदारकर (४.५), अक्षज पाटील (४) पराभूत वि. राजवर्धन लोदम (५), ओ पाबळे (४.५) बरोबरी वि. नंदिनी लोदम (४.५), वरद पाटील (४.५) वि. वि. प्रद्युम्न निचले (४), हेतांश बावळे (३) पराभूत वि. गुनित सोमाई (४.५), अवनीश शिंदे (४) वि. वि. अजेयसिंह कुंजिर (३).

१३ वर्षांखालील गट - समृद्धी मक्तेदार (५.५) पराभूत वि. अविरत चौहान (८), अर्णव तनपुरे (५.५) बरोबरी वि. वेदान्त काळे (६), स्वयम घोंगे (५) पराभूत वि. वरद दीक्षित (६), अभिज्ञ शेळके (६) वि. वि. अभिराम मेनन (५), अरिज साठे (४.५) पराभूत वि. विधीत गाढवे (५.५).

९ वर्षांखालील गट - रियांश पितळे (६) वि. वि. नंदी प्रितिका (६.५), सात्त्विक शर्मा (६) पराभूत वि. पराशर रुद्रांश (६), अगस्त्य शिवरकर (५) पराभूत वि. दिवित सी. (६), अहुजा श्लक (६) वि. वि. रेयांश भाडाईत (४.५), अद्विक नवल (५.५) वि. वि. रिशान हरपुडे (४.५), विहान कांबळे (५.५) वि. वि. रिषभ पाटील (४), विश्वधन बट्टूल (४) पराभूत वि. रहीत जालन (५).

७ वर्षांखालील गट - सक्षम साहा (७.५) वि. वि. अभिनव कनव (६), शिव चाकवे (७) वि. वि. तनिष्का जैन (५), रिद्धेश कुलकर्णी (६) वि. वि. पाखी पटेल (५), ईशिता चौरे (४.५) पराभूत वि. मिहीर देवळेकर (५), गिरिक रोहरा (५.५) वि. वि. वंश काओतेवार (४), अर्णव वमन (५) वि. वि. अन्वित बोरगवे (४), राज्ञी कुलकर्णी (४.५) बरोबरी वि. तक्ष सी. (४.५).

# ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड शहर’ अभियानात सहभाग नोंदवून ‘लोक चळवळ’ बनवावी

**महापौर रवि लांडगे**




**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड शहर धुळमुक्त करण्यासाठी महापालिका विविध उपाययोजना राबवत आहे. मात्र, या उपक्रमाला यश मिळवण्यासाठी नागरिक, गृहनिर्माण सोसायट्या, व्यावसायिक आस्थापना तसेच बांधकाम व्यावसायिक यांनीही आपली जबाबदारी स्वीकारून प्रशासनाला सहकार्य करणे आवश्यक आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरातील स्वच्छतेकडे जागरूकतेने लक्ष दिल्यास पिंपरी चिंचवड शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनू शकते. ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड शहर’ या अभियानात नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून ही मोहीम लोकचळवळ बनवावी, असे आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केले. पुनावळे येथील ७ प्लमेरिया ड्राईव्ह सोसायटी येथे आयोजित धुळमुक्त शहर अभियान जनजागृती बैठकीत उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करतांना महापौर रवि लांडगे बोलत होते. या बैठकीस उप महापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगर सदस्या रेश्मा भुजबळ, नगर सदस्य कुणाल वाव्हळकर, सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव, संत तुकाराम महाराज साखर कारखान्याचे संचालक चेतन भुजबळ, शलाखा बोडांवार, गजानन सूर्यवंशी, गणेश पायाळ यांच्यासह महापालिकेचे सह शहर अभियंता सुनिल भागवानी, कार्यकारी अभियंते सोहन निकम, योगेश आल्हाट, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, शांताराम माने यांच्यासह सोसायटी चेअरमन गणेश भामे, सामाजिक संघटना प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महापौर रवि लांडगे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहर वेगाने विकसित होत आहे. विकासकामांमुळे काही ठिकाणी धुळीची समस्या निर्माण होत असली तरी प्रशासन योग्य नियोजन व उपाययोजनांच्या माध्यमातून ती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करीत आहे. शहर स्वच्छ आणि धुळमुक्त ठेवण्यासाठी केवळ महापालिका प्रशासनाचे प्रयत्न पुरेसे नसून नागरिकांनीही त्यात सक्रिय सहभाग नोंदवणे आवश्यक आहे. स्वच्छतेबाबत जागरूकता वाढवून आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करून नागरिकांनी या अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीत मांडण्यात आलेल्या सूचनांच्या आधारे धुळमुक्त पिंपरी चिंचवड अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत महापालिका प्रशासनाकडून पुढील नियोजन करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. शहरातील पर्यावरणीय संतुलन राखण्यासाठी तसेच नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी धुळमुक्त शहर ही काळाची गरज असून यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी संयुक्तपणे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

बैठकीदरम्यान शहरातील विविध सामाजिक संघटना, नागरिक प्रतिनिधी तसेच स्थानिक पदाधिकाऱ्यांनी धुळमुक्त शहरासाठी विविध सूचना मांडल्या. शहरातील रस्त्यांवर नियमित पाणी फवारणी करणे, बांधकाम स्थळांवर योग्य त्या उपाययोजना करणे, रस्ते स्वच्छता मोहीम अधिक प्रभावीपणे राबविणे, तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे यासारख्या मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. नागरिकांच्या सूचनांची दखल घेत महापौर रवि लांडगे यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

महापौर रवि लांडगे यांनी शहरातील वाढते बांधकाम, वाहतूक व विकासकामांमुळे निर्माण होणाऱ्या धुळीच्या समस्येबाबत प्रशासन विविध उपाययोजना करत असल्याची माहिती दिली. शहरातील प्रमुख रस्त्यांवर यांत्रिक पद्धतीने साफसफाई, पाण्याची फवारणी, बांधकाम स्थळांवर संरक्षक जाळी लावणे, मलबा व्यवस्थापन तसेच सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेबाबत कठोर नियमांची अंमलबजावणी करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. नागरिकांच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ, सुंदर आणि धुळमुक्त करण्यासाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे देखील महापौर रवि लांडगे यांनी सांगितले. यावेळी बोलताना उपमहापौर शर्मिला बाबर यांनीही शहर स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. शहरातील विविध सामाजिक संघटनांनी महापालिकेच्या उपक्रमांना सहकार्य करून धुळमुक्त शहराच्या उद्दिष्टपूर्तीसाठी एकत्रितपणे काम करण्याची तयारी दर्शवली. कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव यांनी ‘धुळमुक्त पिंपरी चिंचवड शहर’ अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. लोकचळवळ जागवा – पर्यावरण वाचवा” या पर्यावरण विषयक पथनाट्याचे प्रभावी सादरीकरण पृथ्वीराज शिंदे व त्यांच्या टीमकडून करण्यात आले. या पथनाट्यातून पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि धुळमुक्त शहरासाठी नागरिकांनी पुढाकार घेण्याचा संदेश देण्यात आला.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### लग्नाचे आमिष दाखवून महिलेची 31 लाखांची फसवणूक; चिंचवड पोलिसांत गुन्हा दाखल

पिंपरी (दैनिक संध्या) : लग्नाचे आमिष दाखवून ओळख वाढवत विश्वास संपादन करत महिलेची तब्बल ३१ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार पिंपरी-चिंचवड शहरातील दळवीनगर परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी जयेश पाटील उर्फ आदर्श प्रशांत म्हात्रे याच्या विरोधात चिंचवड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने शादी डॉट कॉम या मोबाईल ॲपवरून फिर्यादी महिलेशी ओळख वाढवली. त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवत त्यांचा विश्वास संपादन केला. पुढे विविध कारणे सांगत फिर्यादींना कर्ज काढण्यास भाग पाडले आणि वेळोवेळी पैसे घेतले. या प्रकारात आरोपीने फिर्यादींकडून एकूण ३१ लाख २० हजार २५७ रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर फिर्यादींनी चिंचवड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून या प्रकरणाचा पुढील तपास चिंचवड पोलिसांकडून सुरू आहे.

### युद्धजन्य परिस्थितीमुळे संकटातील उद्योजकांना बळ द्या : आमदार महेश लांडगे



■ ‘पीएमआर’मधील उद्योजकांसाठी उपाययोजना करा; ‘पाईंट ऑफ इन्फॉर्मेशन’च्या माध्यमातून केली मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : आंतरराष्ट्रीय पातळीवरील युद्धजन्य परिस्थितीमुळे उद्योजकांना गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागेल. इराण, इस्त्राईल आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे कच्चा माल, इंधन आणि गॅस पुरवठ्यावर परिणाम होत आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक पट्टयातील लघु उद्योजक मोठ्या संकटात आहेत. यासाठी राज्य व केंद्र सरकारने ठोस उपायोजना कराव्यात, अशी मागणी भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी केली. महाराष्ट्र विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये ‘पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन’ च्या माध्यमातून आमदार लांडगे यांनी उद्योजकांच्या समस्यांकडे लक्ष वेधले. लघु उद्योजकांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी तातडीने उपाययोजना केल्या जाव्यात. कारण, उद्योजक बंद पडतील, अशी भिती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे उद्योजकांना कर सवलत, अनुदान, आणि आर्थिक मदत यांसारख्या उपायांनी उद्योगांना बळ द्यावे, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली. आमदार महेश लांडगे म्हणाले की, युद्धजन्य परिस्थितीमुळे पिंपरी-चिंचवडसह चाकण औद्योगिक क्षेत्रातील अनेक कंपन्या या परिस्थितीत त्यांच्या उत्पन्नावर गंभीर परिणाम सहन करीत आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थिती युद्धजन्य असल्यामुळे गॅस आणि कच्चा मालाचा पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे उत्पादन ठप्प झाले आहे. व्यावसायिक गॅस सिलेंडरचासुद्धा तुटवडा आहे. ॲल्युमिनिअम आणि कॉपरसह इतर धातुंचा पुरवठा बंद झाला आहे. त्यामुळे उद्योजक हवालदिल झाले आहेत.

### स्मार्ट सिटीच्या नावाखाली चुकीची कामे; विश्वजित बारणे यांच्याकडून ‘पोलखोल’

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरात स्मार्ट सिटीच्या नावाखाली १ हजार कोटी रुपयांची कामे झाली आहेत. अर्बन स्ट्रीटच्या नावाखाली मोठे रस्ते छोटे केले. सायकल ट्रॅक केले. रस्ते अरुंद झाल्याने वाहतूक कोंडीत भर पडत आहे. सीसीटीव्ही कॅमेरे बंद आहेत. अतिशय चुकीची कामे झाली आहेत. या कामांची देखभाल कोण करणार, त्याची जबाबदारी कोण घेणार आहे. स्मार्ट सिटीचा नियोजन शून्य कारभार असून त्यावर नियंत्रण ठेवण्याची मागणी शिवसेना गटनेते विश्वजित बारणे यांनी महापालिका सभेत केली. पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी कंपनीवर संचालकांची नियुक्ती सर्वसाधारण सभेत करण्यात आली. यावर बोलताना शिवसेना गटनेते विश्वजित बारणे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 2017 मध्ये देशातील 100 शहरात स्मार्ट सिटी योजना सुरू केली. पिंपरी-चिंचवडचाही स्मार्ट सिटीत समावेश करण्यात आला. त्याला नऊ वर्षे पूर्ण होत आली, तरी स्मार्ट सिटीची विविध कामे संपूर्ण शहरात सुरू आहेत. स्मार्ट सिटी बंद करण्यासाठी शेवटचे काही महिने राहिले आहेत. या माध्यमातून 980 कोटींची गुंतवणूक शहरात करण्यात आली आहे. 490 कोटी केंद्र, 245 कोटी राज्य सरकार आणि 245 कोटी महापालिकेने दिले आहेत. शहरात 1 हजार कोटी रुपयांची कामे स्मार्ट सिटीच्या नावाखाली झाली आहेत. स्मार्ट पार्किंग, अर्बन डिझायनिंग अंतर्गत रस्ते, वायफाय, सीसीटीव्ही सर्व्हिलेनस्स, कमांड सेंटर अशी विविध कामे झाली आहेत. स्मार्ट सिटी अंतर्गत बसविलेले एकही सीसीटीव्ही कॅमेरे चालू नाहीत. 8 हजार 790 सीसीटीव्ही कॅमेरे शहरात बसवले आहेत. त्यापैकी 3 हजार 827 कॅमेरे चालू असल्याचे सांगितले जात आहे.

## रिकव्हरी एजंटविरुद्ध वाकड पोलिसांत गुन्हा दाखल

**पिंपरी (दै. संध्या) :**



कर्जाच्या हप्त्यांच्या वादातून टीव्हीएस क्रेडिटच्या रिकव्हरी एजंटने तरुणाला शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची घटना डांगे चौक परिसरात घडली. या प्रकरणी वाकड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी फरार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रमोद कैलास सावंत (वय २५, व्यवसाय – सिक्युरिटी गार्ड, रा. वाघेरे कॉलनी क्र. ३, पिंपरी गाव) यांनी याबाबत तक्रार दिली आहे. त्यानुसार सुभाष पुरोहित (वय ३२, व्यवसाय – टीव्हीएस क्रेडिट लोन रिकव्हरी एजंट, रा. काळेवाडी, पुणे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना गुरुवारी (दि.१२ मार्च) रात्री सुमारे साडेनऊच्या सुमारास वाकड येथील डांगे चौक परिसरातील सत्यम बारसमोरील रस्त्यावर घडली. फिर्यादी प्रमोद सावंत आणि त्यांचा मित्र रमन द्विवेदी (वय २२) हे दोघे तेथे उभे राहून गप्पा मारत असताना आरोपी तेथे आला. आरोपीने फिर्यादीला “माझा फोन का उचलत नाहीस? तुझे लोनचे हप्ते बाकी आहेत, पैसे कधी देणार?” असे म्हणत पैशांची मागणी केली. त्यानंतर शिवीगाळ करत आरोपीने सावंत यांना लाथाबुक्यांनी मारहाण केली. तसेच हातातील कड्याने त्यांच्या डोक्यावर वार करून जखमी केले, असे तक्रारीत नमूद आहे. दरम्यान, सावंत यांचा मित्र रमन द्विवेदी हा भांडण सोडविण्यासाठी मध्ये पडला असता आरोपीने त्यालाही धक्का दिला. तसेच सावंत यांना जिवे मारण्याची धमकी देत आरोपी तेथून पळून गेला.

## यशराज अमराळे व गौरव वाघेरे यांची ‘महाराष्ट्र केसरी’साठी निवड

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघ व संदिपभाऊ वाघेरे युवा मंच संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली महाराष्ट्र केसरी निवड कुस्ती चाचणी स्पर्धेत पै. गौरव वाघेरे (माती) आणि पै. यशराज अमराळे, (गादी) विभागातून यांची महाराष्ट्र केसरी साठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने महाराष्ट्र राज्य अधिवेशन ६८ वे आणि राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धा व महाराष्ट्र केसरी कुस्ती किताब लढत वाघोली, पुणे येथे दिनांक १८ ते २२ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. यासाठी पिंपरी चिंचवड शहर कुस्तीगीर संघाची निवड चाचणी स्पर्धेतून गादी विभागातून (८६ ते १२५ किलो महाराष्ट्र केसरी गट) चर्होलीचा पै. यशराज अमराळे आणि आकुर्डीचा पै. तन्मय काळभोर यांच्यात लढत झाली. यामध्ये अमराळे यांनी गुणांनी विजय मिळवून महाराष्ट्र केसरी कुस्ती किताब लढती साठी प्रवेश निश्चित केला. तर माती विभागातून पिंपरीचा पै. गौरव वाघेरे आणि भोसरीचा पै.समाधान दगडे यांच्यात चुरशीशी लढत झाली. पै वाघेरे याने अधिक गुण मिळवत विजय मिळवून महाराष्ट्र केसरी कुस्ती किताब लढत मध्ये प्रवेश मिळवला.

तसेच या स्पर्धेत बालगट व कुमार गट यांच्या देखील निमंत्रित कुस्ती स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी चिंचवड कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष हनुमंत गावडे, नगरसेवक संदिप वाघेरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संघाचे कार्याध्यक्ष विशाल कलाटे, ज्ञानेश्वर कुटे, सचिव संतोष माचुत्रे, दिलीप बालवडकर, भारत केसरी पैलवान विजय गावडे तसेच, दिलीप काळे, काळूराम कवितके, पंडित मोकाशी, बबन बोऱ्हाडे, राजू कुदळे, रतन लांडगे, सदाशिव नेवाळे, दिलीप यादव, राजाभाऊ जाधव, सुरेश वाळुंज, विजय पाटुकले, बाबू चिंचवडे, दिगंबर वाघेरे, दिलीप बारणे, राजेश काळभोर, वस्ताद दत्तोबा नाणेकर, नथु शिंदे, सामाजिक कार्यकर्ते शेखर अहिरराव, सचिन गव्हाणे, अनिल रसाळ, सतीश वाघेरे उपस्थित होते.

पंच म्हणून विजय कुटे, रोहिदास आमले, बाळासाहेब काळजे, चंद्रकांत मोहोळ,रूपेश जाधव, निलेश मारणे, तुषार गोळे, अमित म्हस्के, पप्पू कालेकर यांनी काम पाहिले. तर कुस्ती निवेदक हंगेश्वर धायगुडे यांनी केले या निवड चाचणी स्पर्धेमध्ये एकूण १९१ खेळाडूंनी सहभाग घेतला होता तर १८६ लढती झाल्या. स्वागत संदीप कापसे यांनी केले,सूत्रसंचालन अरुण तांबे,तर

## ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्यावतीने महिला दिन उत्साहात साजरा

**पिंपळे सौदागर (दै. संध्या) :**




संसारामध्ये पुरुषांचा विश्वास आणि पाठिंबा असला की, त्या बळावरच महिला समाजामध्ये प्रगती करु शकतात असे प्रतिपादन डॉ. धनश्री सोनवणे यांनी केले. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने आयोजित महिला दिनानिमित्त कार्यक्रमात त्या बोलत होत्या. शनिवार दि.१४ रोजी स्व. बाळासाहेब कुंजीर क्रीडांगणावर त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रभागातील भाजपाच्या नगरसेविका डॉ. कुंदा भिसे, अनिता काटे, सुप्रसिद्ध लेखिका, कवियत्री गीतांजली जोशी, गायिका, गीतकार आणि संगीतकार भारती न्यायाधीश, पिंपरी चिंचवड ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरोळ तसेच पी. के. इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या डॉ. धनश्री सोनवणे यांचा शाल श्रीफळ आणि गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पिंपरी चिंचवड भाजपाचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न बापू काटे, उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे, चॅलेंजर पब्लिक स्कूलचे संस्थापक संदिप काटे, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. सुभाषचंद्र पवार, सचिव सखाराम ढाकणे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शकुंतला शिंदे यांनी केले. महिला दिनानिमित्ताने विवेकानंद लिगाडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निर्मला कासार यांनी केले तर भामिनी महाले यांनी आभार मानले. रेखा येळंमकर यांनी कविता सादर केली. सुरेखा पाटील यांनी महिला गीत गायले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शोभा राजगुरे, विमल मोंढेकर, अशोक येळंमकर, सुभाष विधाते, रमेश चांडगे, अशोक कलाल आदि पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## पिंपरी-चिंचवडमध्ये ई-चार्जिंग स्टेशन प्रकल्प रखडला

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरात ई-चार्जिंग स्टेशन उभारण्याची घोषणा केली असली तरी, प्रत्यक्षात हे प्रकल्प कागदावरच रखडल्याचे समोर येत आहे. चार्जिंग स्टेशन्सअभावी ई-वाहनचालकांची मोठी गैरसोय होत असून, पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या उद्दिष्टाला फटका बसत आहे. या कामासाठी पालिकेकडून तीनवेळा निविदा काढूनही त्यास अद्यापही प्रतिसाद न मिळाल्याने महापालिकेकडून अद्यापपर्यंत एकही चार्जिंग स्टेशन उभारण्यात आलेले नाही. या प्रकल्पासाठी महापालिकेने तीन निविदा काढल्या; परंतु ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. भविष्यात ईलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढेल की नाही, या भीतीपोटी कंपन्यांनी जोखीम घेण्याचे टाळल्याने निविदेस अल्पप्रतिसाद मिळाला. तिसऱ्या निविदेला दिल्ली येथील कंपनीला टेंडर दिल्याचे महापालिका अधिकाऱ्यांकडून सांगण्यात येत आहे. त्यानुसार, नियोजित जागांवर चार्जिंग पॉईंट उभारण्याचे अधिकार कंपनीला देण्यात आले; परंतु पुन्हा ही निविदा रद्द करण्यात आली. गेल्या तीन वर्षांपासून निविदा रद्दचे प्रकार घडत असल्याने हे चार्जिंग स्टेशन्स प्रत्यक्षात सुरू होतील, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. पिंपरी-चिंचवड शहरात सुमारे चाळीस हजारांहून अधिक ईलेक्ट्रीक वाहने असल्याची माहिती पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाने दिली आहे.

# उन्हाचा कडाका वाढताच पिंपरीत माठांना मागणी

***थंड पाण्यासाठी नागरिकांचा पारंपरिक माठांकडे कल; मातीच्या भांड्यांच्या किमतीत २० टक्के वाढ***

**पिंपरी (दै. संध्या) :**



पिंपरी नेहरुनगर, संत तुकारामनगर, वल्लभनगर, मोरवाडी, लालटोपीनगर, मासुळकर कॉलनी, अजमेरा वास्तूउद्योग, यशवंतनगर परिसरात ठिकठिकाणी माठविक्रेते हातगाडीवर माठ विक्रीसाठी जवळच्या वसाहतीतील रस्त्यावर फिरताना दिसतात. सध्या सर्वसामान्य नागरिकांच्या फीजला मागणी वाढत आहे.

उन्हाळ्यात मातीने बनविलेल्या माठाला मागणी मोठी असते. मात्र, बदलत्या काळानुसार थंडगार पाण्याच्या फीजची जागा सर्वसामान्य नागरिकांच्या मटक्यांनी घेतली आहे. आजही माठातील पाणी शुद्ध आणि आरोग्याला उपायकारक ठरत असल्याचा समज अनेकांमध्ये असल्याने घरात थंड पाण्यासाठी माठ वापरला जातो. त्यामुळे पिंपरी शहरात अनेक ठिकाणी मातीचे भांडे व्यासायिकांकडे निरनिराळ्या आकारातील माठ ग्राहकांसाठी उपलब्ध करून ठेवले आहेत.

माठ तयार करणे व तो ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी अनेक व्यावसायिक रस्त्याच्या कडेला स्टॉल लावत आहेत. तर बहुतांश व्यावसायिक नागरिकांपर्यंत पोहोचून माठांची विक्री करत आहेत. यामध्ये मोठ्या प्रमाणावर त्यांना कष्ट घ्यावे लागत आहेत. रखरखत्या उन्हात नागरिकांना थंड पाणी पिण्यास मिळावे व आपल्या संसाराला दोन पैसे मिळावेत, अशी भावना या विक्रेत्यांच्या मनात आहे. माठ हातगाडीवर पॅक करून दोरीने बांधून जवळ झाडाच्या सावलीत कित्येक वेळा एका ठिकाणी थांबून खऱ्या विक्री केली जात आहे. यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत मातीच्या भांड्यांच्या किमतीत वीस टक्क्यांनी वाढ झाली आहे.

> उन्हाळ्यात तहान भागविण्यासाठी महागड्या फिज व जार वस्तू खरेदी करण्याऐवजी मातीच्या घागरी, माठ, रांजन अधिक फायदेशीर ठरत आहे. यामुळे आरोग्यदेखील चांगले राहत आहे. फ्रिजमधील अतिथंड पाणी घशाला बाधक ठरते; परंतु माठातील पाणी शरीराला बाधत नाही. यामुळे आम्ही घरी फिज असूनदेखील माठातील पाण्यालाच प्राधान्य देतो.
>
> **- उषा सिरसाठ, गृहिणी**
>
> बाजारात लहान व मोठ्या दोन्ही आकाराचे माठ विक्रीसाठी उपलब्ध आहेत. यात लहान आकाराचे माठ 100 ते 150 रुपयांना आहेत. तर मोठे माठ 250 ते 350 रुपये आणि रांजन 500 ते 800 रुपयांपर्यंत विक्री होत आहेत.
>
> **- दिनकर पंडित, माठविक्रेते**

## थोडक्यात पण महत्वाचे...




### लोकशाहीच्या मंदिराचे पिकनिक स्पॉटमध्ये रूपांतर करणाऱ्या राहुल गांधींचा निषेध'

पिंपरी (दैनिक संध्या) : संसदेच्या चालू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी आणि इतर खासदारांनी संसदेच्या 'मकर प्रवेशद्वारा'चा वापर 'पिकनिक स्पॉट'प्रमाणे केल्याचा गंभीर आरोप करत आज पिंपरी- चिंचवड भाजपच्या वतीने आक्रमक निदर्शने करण्यात आली. शहराध्यक्ष श्री शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात कार्यकर्त्यांनी काँग्रेसविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. दिल्लीत सध्या संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनादरम्यान काँग्रेसच्या खासदारांनी संसदेच्या मुख्य 'मकर प्रवेशद्वारा' जवळ एकत्र येऊन तिथे 'पार्लमेंट पिकनिक स्पॉट' तयार करण्याचा प्रयत्न केला. लोकसभा अध्यक्षांच्या स्पष्ट निर्देशांनुसार,संसद परिसरातील कोणत्याही प्रवेशद्वाराजवळ धरणे-आंदोलन किंवा निदर्शने करण्यास मनाई आहे. या नियमांचे उल्लंघन करून काँग्रेसने संसदेच्या शिष्टाचाराची पायमल्ली केल्याचा दावा भाजपने केला आहे. आज सकाळी ११ वाजता मोरवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयासमोर हे आंदोलन झाले. यावेळी बोलताना शहराध्यक्ष श्री शत्रुघ्न काटे म्हणाले की, "संसद हे लोकशाहीचे मंदिर आहे. मात्र, राहुल गांधी आणि त्यांचे सहकारी या पवित्र जागेचा वापर वैयक्तिक प्रसिद्धी आणि पिकनिकसाठी करत आहेत. हा केवळ नियमभंग नसून देशाच्या सर्वोच्च सभागृहाचा अवमान आहे."



### संवेदना सोशल फाउंडेशनचे वार्षिक स्नेहसंमेलन

मुंबई (दैनिक संध्या) : समाजातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय काम करणाऱ्या संवेदना सोशल फाऊंडेशनचे वार्षिक स्नेहसंमेलन विक्रोळी कन्नमवार नगर येथे उत्साहात साजरे करण्यात आले.दिव्यांग विद्यार्थ्यांनी नाच व गाणी म्हणून सर्व उपस्थितांचे लक्ष्य वेधून घेतले.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जे.आर.खट्टर चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त एम.डी.खट्टर,समाजसेवक अनिल ग्रोवर,ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर,दिशा वेल्फेअर ग्रुप चे अध्यक्ष दिनेश बेरीशेट्टी,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विक्रोळी विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले,मनसे उपाध्यक्ष प्रशांत नेरुरकर, मनसे शाखाध्यक्ष निलेश साळवी,संस्थेच्या अध्यक्षा प्रिती नितीन शिरीसकर,उपाध्यक्ष गणेश गणपत शिरीसकर,सचिव सचिन गणेश शिरिसकर, कोषाध्यक्ष नितीन गणेश शिरीसकर आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी खेळात प्रावीण्य मिळाल्याबद्दल त्यांना मान्यवरांचे हस्ते प्रशस्तिपत्र देण्यात आली. हे विद्यार्थी व पालक माझी ऊर्जा आहे.त्यांच्या शिवाय मी अपुरी आहे. असे भावनिक उद्गगार संस्थेच्या अध्यक्ष प्रिती शिरीसकर यांनी काढले.तर विद्यार्थ्यांचे बसविलेले सांस्कृतिक कार्यक्रम पाहून प्रमुख पाहुणे एम. डी.खट्टर यांनी शिक्षिका व पालक यांचे कौतुक केले.याप्रसंगी कश्मीरा अहिरे,गायत्री गायकवाड, व पल्लवी वारंग या शिक्षक कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सरस्वती गणेश शिरिसकर, विजय विठ्ठल शिरीसकर,नंदकुमार विश्वनाथ जोशी,मंदाकिनी गणेश चिपळूणकर,क्षितिज गिम्हवणेकर,देवांशी प्रतिक आंबेकर यांनी बरीच मेहनत घेतली होती.एम.डी.खट्टर यांनी संस्थेस पंचवीस लाख रुपये देणगी दिली.




### ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर कुर्ला वतीने ग्राहक हक्क दिन उत्साहात साजरा

मुंबई (दैनिक संध्या) : ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर कुर्ला तालुका वतीने १५ मार्च २०२६ हा जागतिक ग्राहक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष संजय येवले,उपाध्यक्ष दिनेश बैरीशेट्टी,सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,सदस्य स्मिता कवडे,सल्लागार मुकुंद कुलकर्णी आदि मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात सकाळी संपन्न झाला.प्रास्ताविक स्मिता कवडे यांनी केले.यामध्ये त्यांनी संस्थेच्या विषयी माहिती दिली.दरवर्षी १५ मार्च रोजी जागतिक ग्राहक दिन साजरा केला जातो. ग्राहकांना अनेकदा काळाबाजार, मोजमापातील त्रुटी, मनमानी किंमती आकारणे, साठेबाजी, भेसळ, दर्जाहीन वस्तूंची विक्री, फसवणूक, वस्तूंच्या विक्रीनंतर हमी किंवा हमी देऊनही सेवा न देणे अशा समस्यांना तोंड द्यावं लागतं त्यामुळे या समस्यांपासून सुटका व्हावी आणि त्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव व्हावी म्हणून हा दिवस साजरा केला जातो.असे संस्थेचे सल्लागार मुकुंद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन पर भाषणात सांगितले. १५ मार्च १९६२ रोजी अमेरिकेत ग्राहक चळवळीची सुरुवात झाली, परंतु १९८३ पासून हा दिवस दरवर्षी १५ मार्च रोजी साजरा केला जातो. भारतातील ग्राहक चळवळ १९६६ मध्ये मुंबईत सुरू झाली. यानंतर १९७४ मध्ये पुण्यात ग्राहक पंचायतीची स्थापना झाल्यानंतर अनेक राज्यांमध्ये ग्राहक कल्याणासाठी संस्था स्थापन झाल्या. अशा प्रकारे ही चळवळ ग्राहक हिताच्या रक्षणाच्या दिशेने पुढे सरकली. जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यामागचा विशेष उद्देश ग्राहकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि फसवणूक, काळाबाजार, कमी माप इत्यादींना बळी पडल्यास त्यांना त्याबद्दल तक्रार करण्याचा अधिकार आहे.असे कुलकर्णी पुढे म्हणाले.ग्राहक संरक्षण कायदा ग्राहकांसोबत दैनंदिन फसवणूक रोखण्यासाठी आणि ग्राहकांचे हक्क बळकट करण्यासाठी, 'ग्राहक संरक्षण कायदा-२०१९ हा २० जुलै २०२० रोजी देशात लागू करण्यात आला, ज्यामध्ये फसवणूक पासून संरक्षणासाठी सहा तरतुदी आहेत.असे कुलकर्णी यांनी अधोरेखित केले. संस्थेचे अध्यक्ष संजय येवले यांनी आभार मानले.पाहुण्यांचे स्वागत प्रभात मित्र मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड यांनी केले.सुत्रसंचालन प्रभात मित्र मंडळाचे माजी अध्यक्ष सुरेश सरनोबत यांनी केले.या प्रसंगी जेष्ठ नागरिक दयानंद पडांगळे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

# चाकण बाजारात फळभाज्यांची भरपूर आवक; भाव स्थिर

चाकण (दै. संध्या)



खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याची प्रचंड आवक झाल्याने भाव स्थिर राहिले. बटाटा व लसणाची आवक आणि भावही स्थिर राहिले. जळगाव भुईमूग शेंगा व बंदूक भूईमूग शेंगा यांची काहीच आवक झाली नाही. हिरव्या मिरचीची आवक घटूनही भाव गडगडले. चाकण बाजारात पालेभाज्यांची किरकोळ आवक होऊनही भाव कोसळले. राजगुरुनगर येथील बाजारात काकडी, टोमॅटो, वाटाणा, दोडका, शेवगा व गाजराची उच्चांकी आवक झाली. एकूण उलाढाल ६ कोटी ९० लाख रुपये झाली.

चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १२ हजार क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ३ हजार क्विंटलने वाढल्याने भाव स्थिर राहिले. कांद्याचा कमाल १,४०० रुपयांवर स्थिरावला. बटाट्याची एकूण आवक १,४०० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहूनही भावही १,२०० रुपयांवर स्थिरावले.

लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक स्थिर राहूनही कमाल भावही १२ हजार रुपयांवर स्थिरावले.

हिरव्या मिरचीची एकूण आवक ३२५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ५ हजार रुपयांपासून ७ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे

- कांदा - एकूण आवक - १२,००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,४०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३. ८००. बटाटा - एकूण आवक - १,४०० क्विंटल. भाव क्रमांक १.१,२०० रुपये, भाव क्रमांक २.१,००० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३०८ क्विंटल (१,००० ते १,५०० रू.), कोबी - २२५ क्विंटल (४०० ते ६०० रू.), फ्लॉवर - १८७ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), वांगी - ७२ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), भेंडी - ८० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), दोडका - ५८ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), कारली - ६४ क्विंटल ( २,५०० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा - ६२ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), काकडी - ११५ ( क्विंटल (१,००० ते २,००० रु.), फरशी - ५० क्विंटल (२,००० ते ३,००० रु.), वालवड - ५० क्विंटल (३,००० ते ५,००० रुपये), ढोबळी मिरची - १०४ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), चवळी - ३८ क्विंटल (२,००० ते ३,००० रु.)

## अनिकेत वाघोदे, विराज पारखे यांना टेंट पेगिंगमध्ये सुवर्ण

पुणे (दै. संध्या)

■ पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धा; स्टेट इक्वेस्ट्रियन असोसिएशनचा सहभाग

पुणे महानगरपालिकेतर्फे आयोजित पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धेत तिसऱ्या दिवशी टेंट प्रकारात पुण्यातील दिग्विजय हॉर्स रायडिंग ॲकॅडमीच्या अनिकेत वाघोदे यासह राज अश्व हॉर्स रायडिंग ॲकॅडमीच्या विराज पारखे याने आपापल्या गटात सुवर्णपदक पटकावले. स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा सुरु आहे. स्पर्धेत स्टेट इक्वेस्ट्रीयन असोसिएशनचा सहभाग आहे. टेंट पेगिंग प्रकारात खुल्या गटात अनिकेत वाघोदे याने दोन वेगवेगळ्या घोड्यांवरून सहभागी होत सुवर्ण व रौप्य पदकाची कमाई केली. तर, अश्वारूढ क्रीडा असोसिएशनच्या करमजीत सिंग याला ब्रॉंझ पदक मिळाले. युवा गटात विराज पारखे याने सुवर्ण तर एम.एन. हॉर्स रायडिंग अकॅडमीच्या समर्थ राजपूत याने रौप्य पदक पटकाविले.

ऑलिम्पिकमधील खेळाचा वेगळा प्रकार असलेल्या अश्वारोहण स्पर्धेचा हा थरार दि. १५ मार्च पर्यंत स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर दररोज सकाळी ८ ते ११ आणि सायंकाळी ५ ते ७ यावेळेत पुणेकरांना अनुभवता येणार आहे. स्पर्धा पाहण्यासाठी प्रवेश विनामूल्य असून पुणेकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाला स्वायतत्ता देण्यासाठी समिती स्थापन

मुंबई (दै. संध्या)

समितीने सविस्तर अहवाल तीन महिन्यांच्या आत शासनाला सादर करायचा आहे. समितीला आवश्यक ती माहिती आणि तांत्रिक सहाय्य वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयामार्फत (डीएमईआर) उपलब्ध करून देण्यात येणार असून सदस्यांना शासन नियमानुसार मानधन, प्रवास खर्च व इतर भत्ते देण्यात येणार आहेत.

मुंबईतील ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज. जी. समूह रुग्णालय तसेच नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थांना स्वायत्तता देण्यासंदर्भात सविस्तर धोरणात्मक आराखडा तयार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी राज्याचे माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने शासन निर्णय जारी केला आहे. स्वायत्ततेच्या माध्यमातून राज्यातील प्रमुख शासकीय वैद्यकीय संस्थांची शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन क्षमता आणि आरोग्यसेवा अधिक प्रभावी करण्याचा शासनाचा उद्देश असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

समितीत टाटा मेमोरिअल रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. राजेंद्र बडवे, के.ई.एम. रुग्णालयाचे माजी संचालक डॉ. संजय ओक, ग्रॅन्ट वैद्यकीय महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रणजीत माणकेश्वर, बै. जी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पुणे येथील प्राध्यापक व विभागप्रमुख डॉ. राजेश कार्यकर्ते, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलसचिव यांचा सदस्य म्हणून समावेश आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे प्रबंधक हे समितीचे सदस्य सचिव असतील. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची सध्याची प्रशासकीय व शैक्षणिक संरचना, स्वायत्त दर्जा देण्याची आवश्यकता,संभाव्य लाभ, तसेच देश-विदेशातील यशस्वी मॉडेल्सचा अभ्यास समिती करणार आहे. यामध्ये एम्स, पीजीआय चंदीगड आणि टाटा मेमोरिअलसारख्या संस्थांच्या व्यवस्थापन पद्धतीचा आढावा घेण्यात येणार आहे.

स्वायत्त महाविद्यालयांसाठी संचालक मंडळ आणि शैक्षणिक परिषद यांची रचना, व अधिकार. संचालक/अधिष्ठाता यांचे अधिकार व जबाबदाऱ्या. स्वायत्त व्यवस्थेसाठी आवश्यक आर्थिक व प्रशासकीय यंत्रणेबाबत शिफारस करणे. आर्थिक स्वातंत्र्य, अंतर्गत महसूल निर्मिती, लेखापरीक्षण व्यवस्था, तसेच कर्मचारी व अध्यापकांसाठी नवीन सेवा अटी आणि धोरणे याबाबत समिती शिफारसी करणार आहे. आवश्यक कायदेशीर, प्रशासकीय व धोरणात्मक बदलांबाबतही समिती शासनाला मार्गदर्शन करणार आहे.

शासकीय शैक्षणिक संस्थांना स्वायत्तता देताना त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता प्रशासकीय व आर्थिक बाबींमध्ये अधिकारांचे हस्तांतरण सुचवणे. स्वायत्त संस्थेच्या कार्यक्षमतेसाठी देखरेख, मूल्यमापन व उत्तरदायित्व यंत्रणेबाबत शिफारस करणे. धोरणाची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्याकरिता आराखडा तयार करणे आदि कामे समिती करणार आहे.

## आ. शेखर निकम यांच्या विकासदृष्टीतून चाफे-मोरेवाडी येथे सभागृह उभारणी

संगमेश्वर (दै. संध्या)

■ ढोल-ताशांच्या गजरात जंगी स्वागत

■ "लोकांनी दाखवलेला विश्वासच माझी ताकद आहे; त्या विश्वासाला विकासाच्या कामातून उत्तर देणे हे माझे कर्तव्य आहे."- आमदार शेखर निकम



संगमेश्वर तालुक्यातील चाफे-मोरेवाडी येथे करजुवे जय गणेश मित्र मंडळाच्या सभागृहाचे उद्घाटन कार्यसम्राट आमदार शेखर निकम यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रसंगी ग्रामस्थांनी आमदार निकम यांचे ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक काढत जंगी स्वागत केले. गावकऱ्यांनी केलेल्या स्वागतामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

चाफे-मोरेवाडी परिसरात गावकऱ्यांसाठी स्वतंत्र सभागृह असावे, अशी मागणी ग्रामस्थांनी आमदार शेखर निकम यांच्याकडे केली होती. ग्रामस्थांच्या या मागणीची दखल घेत आमदार निकम यांनी तत्परतेने पाठपुरावा करत आमदार स्थानिक विकास कार्यक्रमातून १० लाख रुपये तसेच कोयना भूकंप पुनर्वसन निधीतून ८ लाख रुपये असा एकूण निधी उपलब्ध करून दिला. या निधीतून उभारण्यात आलेल्या करजुवे जय गणेश मित्र मंडळ, चाफे-मोरेवाडी सभागृहाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले.

उद्घाटन प्रसंगी बोलताना आमदार शेखर निकम*यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत, "मी नेहमीच आपल्या पाठीशी उभा राहीन. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या कामांना प्राधान्य देत पुढील काळातही विकासाची गती कायम ठेवू," असे आश्वासन दिले. त्यांच्या या शब्दांमुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त होत असून आमदार निकम यांच्या विकासाभिमुख भूमिकेचे कौतुक करण्यात आले.

यावेळी सुशिल भायजे, दीपक जाधव, नाना कांगणे, तुकाराम मेस्त्री, आर. के. बाचीम, अक्षय चव्हाण, शेखर उकार्डे, एम. आर. कांबळे, अजय चांदिवडे, शांताराम बाचीम (गावकर), चंद्रकांत मोरे (उपाध्यक्ष), सिताराम बाचीम, गणपत डावल, वेणू गोपाळ (मुंबई), अरुण बाचीम, शिवराम गवतडे तसेच सर्व वाडीप्रमुख व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चाफे-मोरेवाडी परिसरातील सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हे सभागृह उपयुक्त ठरणार असून आमदार शेखर निकम यांच्या विकासकामांमुळे गावाच्या प्रगतीला नवे बळ मिळाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## कल्याण येथे सावित्रीबाई फुले यांचा स्मृती दिन साजरा

कल्याण (दै. संध्या)

सामाजिक बंधन, रुढी परंपरा, अनिष्ठ चालिरिती या मध्ये अडकलेल्या स्त्रीला शिक्षणाच्या माध्यमातून ताठ मानेने सन्मानाने जगण्याची क्रांती ज्योत सावित्रीबाई फुले यांनी पेटविली असे प्रतिपादन श्री सावता माळी मंडळ कल्याण या संस्थेचे अध्यक्ष अनिल थोरात यांनी येथे केले.संस्थेच्या वतीने कल्याण (प) येथे सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या स्मृती दिना निमित्ताने केले सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महिला मंडळच्या अनुराधा भुजबळ (मा मुख्याध्यापिका ) ठाणे म न पालिका यांच्या हस्ते पुष्पहार व ज्योत पेटवून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी विद्या चौधरी यांनी आपले विचार मांडले.अनुराधा भुजबळ यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनवर ओवी सादर केली. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुदाम गाडेकर यांनी आपले विचार मांडताना सांगितले की,आपण भाग्यवान आहोत की या कार्यक्रमास सातत्याने उपस्थितांपैकी विद्या चौधरी यांचे शिक्षण महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरु केलेली ओतूर तालुका जुन्नर या शाळेत शिक्षण घेतले आहे. हे सावित्रीबाई फुले यांचे कार्य दिडशे वर्षांनी आपल्या समोर आहे. या ऋणातुन आपण उतराई होण्याकरिता सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. या कार्यक्रमास विद्या चौधरी, शोभा थोरात, मंदा ताम्हाणे अनुराधा भुजबळ, रविंद्र चौधरी, नवनीत गायकवाड,बाजीराव पाटील,अंकित पिंगळे इत्यादी मान्यवर समाज बांधव भगिनी उपस्थित होते.

## निधीअभावी दररोज पाणीपुरवठा नाही हे सांगणे दुर्दैवी

वाकड (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा १३ मार्च २०२६ रोजी पार पडली. महिन्याभरानंतर महापालिकेची सर्वसाधारण सभा होत असताना, या कालावधीत पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नांवर ठोस कृती काय झाली? याबद्दल प्रशासनाने नेमके उत्तर द्यावे यासाठी भाजपचे नगरसेवक राहुल कलाटे आक्रमक झाले. स्वच्छ पिण्याच्या पाण्यासाठी शहरातील वाकड, ताथवडे, पुनावळेसह रावेत पम्पिंग स्टेशनमधून पाणीपुरवठा होत असलेल्या भागाला नियमित आणि शुद्ध पाणीपुरवठा होण्यासाठी पवना जलवाहिनीच्या कामाला निधीसह तात्काळ गती देण्यात यावी, अशी आग्रही मागणी राहुल कलाटे यांनी यावेळी केली.

पाण्यासाठी निधी अभावाचे कारण सांगणे दुर्दैवी असून, स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा होणे हा नागरिकांचा अधिकार आहे. भाजपने सत्तेत येताना पिंपरी चिंचवडकरांना नियमित पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले असून, ते पूर्ण झालेच पाहिजे, असे म्हणत कलाटे यांनी सभागृहात पवना जलवाहिनीचे काम पूर्ण करण्याबद्दल आक्रमक भूमिका मांडली. शुक्रवारी (१३ मार्च) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत पार पडलेल्या सर्वसाधारण सभेत स्मार्ट सिटी योजना आढावा, दररोजचे पाणीपुरवठा नियोजन, कचरा व्यवस्थापन अशा महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी भाजपचे नगरसेवक राहुल कलाटे बोलत होते.

निधी अभावी पवना जलवाहिनी प्रकल्प पुढे ढकलताना प्रशासनाला हे समजून घ्यावे लागेल की प्रकल्पाला विलंब होईल तसा त्याचा खर्च देखील वाढतच जाणार आहे. त्यामुळे यावर तातडीने कार्यवाही आवश्यक आहे. पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिकांना नियमित पाणीपुरवठ्याचे भाजपने आश्वासन दिले आहे. ते पूर्ण करणे आपले आद्य कर्तव्य आहे, असेही कलाटे यावेळी म्हणाले.



## चाकण प्रशालेत शब्द ओंजळ स्मरणिकेचे दिमाखात प्रकाशन

चाकण (दै. संध्या)

जनता शिक्षण संस्थेच्या चाकण येथील श्री शिवाजी विद्यामंदिर प्रशालेचे प्राचार्य अनिल ठुबे यांच्या प्रेरणादायी संकल्पनेतून शब्द ओंजळ या स्मरणिकेचे दिमाखात प्रकाशन करण्यात आले. "शब्द ओंजळ" ही केवळ एक स्मरणिका नसून शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या मनातील संवेदनशीलता, सृजनशीलता आणि साहित्यप्रेम यांचे सुंदर प्रतिबिंब आहे. या स्मरणिकेत शिक्षक, विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कविता, लेख, अनुभवकथन आणि विविध साहित्य प्रकारांच्या माध्यमातून त्यांच्या विचार विश्वाची समृद्ध झलक आहे. प्रत्येक लेखनात भावना, संस्कार, कल्पकता आणि समाजाभिमुख दृष्टिकोन यांचे सुंदर दर्शन घडते. त्यामुळे ही स्मरणिका प्रशालेच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक ठरली आहे. तसेच प्रा. मंजुषा काळे यांच्या " काव्य मंजुषा " या काव्यसंग्रहाचेही प्रकाशन जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश जगताप यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संस्थेच्या खजिनदार कविता गोरे, जनरल सेक्रेटरी प्रा. सुभाष जावळे, जॉईंट सेक्रेटरी प्राचार्य रविंद्र नवले, असिस्टंट सेक्रेटरी राजेंद्र खरमाटे, उपप्राचार्य बाळासाहेब खामकर, सुनील कुलकर्णी, सिताराम दिघे, रामेश्वर होनखांबे, अतुल क्षीरसागर, चाकण रोटरी क्लबच्या अध्यक्षा सुवर्ण गोरे, डॉ. पल्लवी बेनके आदी उपस्थित होते. यावेळी प्रशालेतील मुलींच्या आरोग्य सुरक्षिततेसाठी सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजेबल मशिन प्रशालेस प्रदान करण्यात आली. प्राचार्य अनिल ठुबे यांनी स्वागत केले. प्रा. राजेंद्र खरमाटे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. कविता गोरे यांनी आभार मानले.



## सिंहगड किल्ल्याचा विकास रायगड व शिवनेरी किल्ल्याच्या धर्तीवर व्हावा - सभापती युवराज काकडे

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

सिंहगड किल्ल्याचा विकास रायगड व शिवनेरी किल्ल्याच्या धर्तीवर व्हावा. तसेच छत्रपती राजाराम महाराज यांच्या पुण्यतिथी कार्यक्रमासाठी वाढीव निधी मिळावा यासाठी, आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांच्या मार्गदर्शनाखाली शासन व जिल्हा परिषद स्तरावर पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही, हवेली पंचायत समितीचे नवनिर्वाचित सभापती युवराज हिरामण काकडे यांनी दिली. छत्रपती राजाराम महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त सिंहगड किल्ल्यावर आयोजित शासकीय कार्यक्रम भक्तीभाव आणि उत्साहात पार पडला. या वेळी सभापती युवराज काकडे यांच्या हस्ते महाराजांच्या समाधीस्थळावर पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी काकडे बोलत होते. यावेळी जिल्हा परिषद सदस्या रुपाली कोंडे, पंचायत समिती सदस्या शुभांगी खिरीड, सदस्य युवराज वांजळे, गटविकास अधिकारी शेखर शेलार, इतिहास संशोधक नंदकुमार मते, माजी पंचायत समिती सदस्य दत्तात्रय घोरपडे, वन अधिकारी अधिकारी बळीराम वायकर, मोडी लिपी अभ्यासक अशोक पाटील, प्रा. देशमुख, नगरसेवक सचिन दोडके, अमित गायकवाड, पंचायत समितीचे विस्तार अधिकारी तसेच ढमढेरे परिवारासह स्थानिक पदाधिकारी, शिवप्रेमी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापुढे बोलताना काकडे म्हणाले, "छत्रपती शिवाजी महाराजांचे सुपुत्र आणि मराठा साम्राज्याचे तिसरे छत्रपती असलेल्या राजाराम महाराजांनी मुघलांविरुद्धच्या संघर्षाच्या कठीण काळात स्वराज्य टिकवण्यासाठी मोठा लढा दिला. त्यांचे निधन ३मार्च १७०० साली सिंहगड किल्ला येथे झाले. त्यानिमित्त दरवर्षी येथे पुण्यतिथीनिमित्त श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित केला जातो.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी "छत्रपती राजाराम महाराज यांच्या कार्याचा गौरव करत स्वराज्य टिकवण्यासाठी त्यांनी दिलेल्या ऐतिहासिक योगदानाची आठवण करून दिली. शिवभक्त व नागरिकांनीही महाराजांच्या समाधीस्थळी अभिवादन करून त्यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. उपस्थितांनी स्वराज्याच्या इतिहासाची आठवण करून देत छत्रपती राजाराम महाराजांच्या आदर्शावर चालण्याचा संकल्प यावेळी व्यक्त केला.

# पुणे-शिरूर महामार्गाचा 'हाय-टेक' कायापालट

**लोणी काळभोर (दै. संध्या)**

■ ६-लेन उन्नत मार्ग आणि मेट्रो एलिव्हेटेड मार्गासाठी आमदार ज्ञानेश्वर (माऊली-आबा) कटके तसेच प्रशासकीय यंत्रणा 'ॲक्शन मोड'वर



शिरूर-हवेली मतदारसंघातील वाहतूक कोंडीचा शाप कायमचा पुसून टाकण्यासाठी आमदार ज्ञानेश्वर (माऊली-आबा) कटके यांच्या संकल्पनेतील 'पुणे-शिरूर महाप्रकल्प' आता प्रत्यक्षात उतरण्याच्या दिशेने वेगाने सरकत आहे. आज वाघोली येथे सर्व संबंधित शासकीय विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकत्र येत पुणे ते शिरूर एलिव्हेटेड महामार्ग तसेच रामवाडी ते वाघोली मेट्रो ६-लेन एलिव्हेटेड महामार्गाची संयुक्त 'मैदानी' पाहणी केली. या प्रकल्पामुळे पुणे ते शिरूर हा प्रवास आता केवळ वेगवानच नाही, तर जागतिक दर्जाचा होणार आहे.

पुणे-शिरूर राष्ट्रीय महामार्ग (NH-753F) हा आधुनिक अभियांत्रिकीचा एक उत्कृष्ट नमुना ठरणार आहे.या मार्गावर खालच्या स्तरावर ६-लेनचा एलिव्हेटेड (उन्नत) रस्ता असेल, तर त्याच्या वरच्या स्तरावर रामवाडी ते वाघोली अशी मेट्रो धावणार आहे. या मेट्रो मार्गासाठी सुमारे ३६६६.२४ कोटी तसेच ५३.४० किमी लांबीच्या या ६-लेन महामार्गासाठी ७,५१५ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, तो BOT (Build-Operate-Transfer) पद्धतीने राबविला जाणार आहे. अनेक अंडरपास, स्थानिक वाहतुकीसाठी स्वतंत्र 'एक्झिट' मार्ग आणि ६-लेनचा भव्य रस्ता यामुळे वाघोलीसह संपूर्ण शिरूर-हवेलीतील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमचा निकाली निघणार आहे. अडचणींवर जागेवरच तोडगा

केवळ कागदावर नियोजन न करता, प्रत्यक्ष जमिनीवर काम सुरू करताना येणारे तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी आमदारांनी सर्व विभागांना एकाच छताखाली आणले. या दौऱ्यात खालील महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली.पुणे मेट्रोचे संचालक अतुल गाडगीळ व त्यांच्या टीमने रामवाडी ते वाघोली मेट्रो मार्गाच्या प्रस्तावाची तांत्रिक पाहणी केली. मेट्रो आणि उन्नत मार्गाचे खांब (Pillars) कसे असतील, याचा आराखडा निश्चित करण्यात आला.

वाहतूक पोलीस उपायुक्त हिम्मत जाधव यांच्याशी चर्चा करून प्रकल्प सुरू असताना पर्यायी मार्गांचे आणि सिग्नल यंत्रणेचे नियोजन करण्यात आले, जेणेकरून कामादरम्यान नागरिकांना त्रास होणार नाही. महावितरण, महापारेषण आणि PWD च्या अधिकाऱ्यांनी मार्गातील वीजवाहिन्या, उच्चदाब वाहिन्या आणि इतर पायाभूत सुविधा हलवण्याबाबत सविस्तर चर्चा केली. 'राइट्स ऑफ वे' (ROW) आणि आवश्यक असणाऱ्या जमिनीबाबत MSIDC व PWD च्या अभियंत्यांनी सद्यस्थितीचा अहवाल सादर केला.

> "गेल्या दीड वर्षांपासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या ऐतिहासिक प्रकल्पाला मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. आजच्या संयुक्त पाहणीचा मुख्य उद्देश हाच आहे की, भूसंपादन किंवा तांत्रिक कारणांमुळे प्रकल्प रेंगाळू नये. या पाहणीनंतर एक सविस्तर अहवाल उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांच्याकडे सादर केला जाईल आणि लवकरच वरिष्ठ पातळीवर अंतिम बैठक घेऊन कामाचा प्रत्यक्ष नारळ फोडला जाईल."
>
> **— आमदार ज्ञानेश्वर (माऊली-आबा) कटके**

**प्रकल्पाचे दूरगामी फायदे**

या प्रकल्पामुळे शिरूर-हवेली तालुक्यातील औद्योगिक क्षेत्राला (IT आणि MIDC) मोठी चालना मिळणार आहे. पुणे-अहिल्यानगर मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि वेगवान होणार असल्याने वेळ आणि इंधनाची मोठी बचत होईल. प्रशासकीय यंत्रणेच्या या संयुक्त हालचालींमुळे आता पुणे-शिरूर महामार्गाचा कायापालट निश्चित झाला आहे. यां दौऱ्यादरम्यान मेट्रोचे संचालक श्रीम गाडगीळ साहेब, पुणे वाहतूक पोलीस उपआयुक्त श्री. हिम्मत जाधव साहेब, MSIDC चे कार्यकारी अभियंता व त्यांची टीम, PWD चे अभियंता, MSEB चे कार्यकारी अभियंता व त्यांची टीम तसेच महापारेषणचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते. तसेच मोठ्या संखेने स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# महिला दिनानिमित्त नीरा येथे बचत गट महोत्सव



**नीरा (दै. संध्या)**

नीरा ( ता.पुरंदर ) येथे महिला दिनाचे औचित्य साधून बचत गट महोत्सवाचे आयोजित करण्यात आलेला महिला बचत गट महोत्सव उत्साहात पार पडला. ज्युबीलंट भारतीया फाऊंडेशन, तसेच नीरा व निंबुत परिसरातील बचत गट व ग्रामसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाला परिसरातील महिलांसह स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महोत्सवात नीरा व निंबुत परिसरातील बचत गटातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत विविध उत्पादनांचे स्टॉल्स उभारले. घरगुती मसाले, चटण्या, लोणचे, कापडी पिशव्या, ज्वेलरी, चायनीज पदार्थ, बांबूपासून तयार केलेल्या वस्तू तसेच आवळ्यापासून बनविलेले विविध पदार्थ यांचा स्टॉल्समध्ये समावेश होता. महिलांनी आपल्या कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन करत स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली.

बारामती ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टच्या विश्वस्त सुंदना पवार कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी डॉ. योगेश कोपरकर, नीरा येथील प्रशासक तेजश्री काकडे, निंबुतच्या प्रशासक निर्मला काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

महोत्सवात स्थानिक नागरिक आणि खवय्यांनी विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत उत्साहाने प्रतिसाद दिला. हस्तकला आणि घरगुती उत्पादनांच्या स्टॉल्सवरही खरेदीसाठी मोठी गर्दी दिसून आली.

**महिलांच्या सक्षमीकरणासाठी उपक्रम**

ज्युबिलेंट भरतिया फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी महिलांना विविध व्यवसायिक प्रशिक्षण दिले जाते. खाद्यपदार्थ तयार करणे, लघुउद्योग सुरू करणे तसेच महिलांसाठी उपयुक्त असणाऱ्या अनेक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणातून तयार झालेल्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी आणि महिलांच्या उद्योजकतेला चालना मिळावी या उद्देशाने महिला दिनानिमित्त दरवर्षी बचत गट महोत्सवाचे आयोजन केले जाते. या उपक्रमातून अनेक महिला आज यशस्वी उद्योजिका बनल्या आहेत.

## नारायणगावात भरदिवसा घरफोडी

**नारायणगाव (दै. संध्या)**

नारायणगाव येथील शिवविहार सोसायटीत भरवस्तीत असलेल्या एका बंद सदनिकेचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी साडेतीन लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. ही घटना आज दुपारी साडेबाराच्या सुमारास अवघ्या २० मिनिटांत घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, सुनंदा नारायण दरेकर (वय ६५) या आपल्या मुलीसह शिवतेज बिल्डिंगमध्ये राहतात. दुपारी त्या कामानिमित्त बाहेर गेल्या असताना पांढऱ्या रंगाच्या मोटारीतून आलेल्या तीन चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कपाटातील दोन तोळे सोने, चांदीचे दागिने आणि २० हजार रुपये रोख असा एकूण साडेतीन लाखांचा ऐवज लंपास केला.

या घटनेची माहिती मिळताच नारायणगाव पोलिस ठाण्याचे साहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे.

नारायणगावमधील कोल्हेमळा परिसरात गृहनिर्माण सोसायट्यांची संख्या वाढली असली, तरी सुरक्षा रक्षकांच्या अभावामुळे चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. ४ डिसेंबर रोजीही सुविधा आणि समृद्धी रेसिडेन्सीमधील सहा सदनिका फोडून १० तोळे सोने व ८० हजारांची रोकड चोरण्यात आली होती. या गुन्ह्यांचा तपास अद्याप लागलेला नसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### उद्योजक संघाकडून क्रिकेट सामन्यांचे आयोजन; जिमा प्रीमियर क्रिकेट लीग

जेजुरी (दैनिक संध्या) : जेजुरी उद्योजक संघाच्या वतीने दिनांक 16 पासून जेजुरी औद्योगिक वसाहतीतील उद्योजक व कामगार यांच्या खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी जीमा प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले आहे. जेजुरी औद्योगिक वसाहतीत तीनशे लहान मोठे कारखाने असून या कारखान्यात आठ हजार कामगार काम करीत आहेत. क्रिकेटच्या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी संघाच्या वतीने या सामन्यांचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेत वेगवेगळ्या कारखान्यातून 10 संघ सहभागी झाले असून हे सामने पानसरे क्रिकेट टर्फ च्या मैदानावर टेनिस बॉल वर हे सामने खेळविण्यात येनार आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघाला एक लाख तर उपविजेत्या संघाला 50 हजार व इतर अनेक बक्षिसे ठेवण्यात आले आहे. अशी माहिती जेजुरी जिमाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे यांनी सांगितले या स्पर्धेचे श्री मार्तंड देवसंस्थान चे माजी प्रमुख विश्वस्त ॲड. धनंजय भोईटे यांच्या हस्ते होणार आहे. तर अध्यक्ष स्थानी जीमाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे असणार आहे. या स्पर्धेचे इंदू केअर फार्मा स्युटिकल्स व किर्लोस्कर फेरस हे मुख्य प्रायोजक असून हे सामने लीग पद्धतीने खेळविण्यात येणार आहेत. या स्पर्धेचे आयोजन जावेद पानसरे, संभाजी जाधव, रवींद्र जोशी, पांडुरंग सोनवणे, राजेश पाटील शकील शेख, अनंत देशमुख, जालिंदर कुंभार आदींनी केले आहे.

### माजी विद्यार्थ्यांना मिळणारा मान हाच आमचा सन्मान - डॉ. किर्ती धारवाडकर

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : विविध क्षेत्रांमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर नोकरी, उद्योग, व्यवसायात एसबीपीआयएमचे माजी विद्यार्थी चमकदार कामगिरी करताना दिसतात. त्यांना त्यांच्या करिअरमध्ये मिळणारा मान सन्मान हा त्यांचे शिक्षक या नात्याने आमचा सन्मान आहे, त्यांचा आम्हाला अभिमान वाटतो. आपले सर्व माजी विद्यार्थी सुसंस्कृत नागरिक म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत आणि देशाच्या विकासात हातभार लावत आहेत. असे एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर म्हणाल्या. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) एस.बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) या महाविद्यालयामध्ये माजी विद्यार्थी मेळाव्यात डॉ. धारवाडकर बोलत होत्या. यावेळी माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष आकाश राऊत, सचिव हेमंत राजेस्थ, खजिनदार डॉ. अनिशकुमार कारिया आणि इतर समिती सदस्य, प्राध्यापक, कर्मचारी आदी उपस्थित होते. या मेळाव्यात १६१ माजी विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. सर्वांनी महाविद्यालयीन काळातील आठवणी आणि व्यावसायिक नेटवर्किंग यांचा अविस्मरणीय अनुभव सांगितला. "पिनॅकल" या माजी विद्यार्थ्यांच्या स्मरणिकेचे दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन आणि प्लेसमेंट विभागाच्या वतीने माजी विद्यार्थी विभागाचे उद्घाटन करण्यात आले. पिनॅकलमुळे माजी विद्यार्थ्यांचा एकमेकांशी दुरावलेला संवाद आणि सहभाग आता अधिक बळकट होईल असे डॉ. कीर्ती धारवाडकर म्हणाल्या. निवडक माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. भविष्यातील उपक्रमांविषयी आपली भूमिका मांडली तसेच मार्गदर्शन, इंटर्नशिप, प्लेसमेंट आणि संस्थात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागाचे आवाहन केले. एसबीपीआयएम मधील आठवणींवर आधारित व्हिडिओ, नृत्य, नाटिका सादर करत अनुभव आणि जुन्या आठवणींना उजाळा देत पुन्हा पुढील वर्षी असाच भव्य मेळावा घेण्याचे अभिवचन देत निरोप घेण्यात आला.

## झील संस्थेच्या ११८ विद्यार्थ्यांची टाटा टोयो रेडिएटर मध्ये निवड

**पुणे (दै. संध्या)**

झील एज्यूकेशन सोसायटी संचलित कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड रिसर्च आणि झील पॉलीटेक्निक, नऱ्हे येथील एकूण 118 विद्यार्थ्यांची प्रतिष्ठित टाटा टोयो रेडिएटर या कंपनीत निवड झाली आहे. ही झील संस्थेसाठी एक उल्लेखनीय आणि अभिमानास्पद कामगिरी मानली जात आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन (E&TC), इलेक्ट्रिकल, रोबोटिक्स अँड ऑटोमेशन आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या शाखांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या उल्लेखनीय प्लेसमेंटमुळे झील संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या उद्योगाभिमुख प्रशिक्षण आणि उच्च दर्जाच्या शैक्षणिक गुणवत्तेचा प्रत्यय येतो. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत संस्थेचे संस्थापक संचालक एस . एम . काटकर,सचिव डॉ जयेश एस . काटकर म्हणाले की, विद्यार्थ्यांचे हे यश झील संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि कौशल्य विकासाचे उत्तम उदाहरण आहे. कॅम्पस डायरेक्टर उद्धव सिद म्हणाले की, विद्यार्थ्यांचे यश हे झील संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या उच्च दर्जाच्या शिक्षणाचे आणि उद्योगसिद्ध प्रशिक्षणाचे प्रतिक आहे, ज्यामुळे विद्यार्थी उद्योगाच्या बदलत्या गरजांना समर्थपणे सामोरे जाऊ शकतात. यावेळी डॉ अजित काटे म्हणाले की, एकाच वेळी इतक्या मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांची निवड होणे ही संस्थेसाठी अभिमानाची बाब असून विद्यार्थ्यांच्या मेहनत आणि समर्पणाचे हे फलित आहे.

## 'त्या' सहा जणांची 'जातवैधता' रद्द करा!

**मन्नेरवारलू जमातीची तीन,कोळी महादेव तीन**

**भिवंडी (दै. संध्या)**

सर्वोच्च न्यायालयाने विवेककुमार सायन्ना आडपोड यांचे 'मन्नेरवारलू' जमातीचे आणि सचिन देवराज धोत्रे यांचे 'कोळी महादेव' जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द केले आहे. या दोघांचे कुटुंबात आणखी सहा जणांकडे 'जातवैधता' प्रमाणपत्र असल्याचा दावा करुन ते सुद्धा रद्द करण्याची मागणी 'ट्रायबल फोरम' या संघटनेने केली आहे.या संदर्भात आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणेचे आयुक्त यांना नुकतेच निवेदन पाठविण्यात आलेले आहे.

निवेदनात नमूद केले की,सर्वोच्च न्यायालयाने विवेककुमार विरुद्ध महाराष्ट्र राज्य विरुद्ध इतर(सिव्हिल अपिल क्र. ३०८९/२०२६) व सचिन विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर (सिव्हिल अपिल क्र.३०९०/२०२६) या प्रकरणात एकत्रित निर्णय संविधानाच्या कलम १४२ द्वारे मिळालेल्या अधिकाराचा वापर करुन २५ फेब्रुवारी २०२६ रोजी देऊन त्यांचे बनावट जातप्रमाणपत्र रद्द केले आहे.अपिलकर्त्यांनी त्यांच्या जमातीच्या दाव्यावर आधारित भविष्यात कोणत्याही लाभाचा ते दावा करणार नाहीत अशी हमी त्यांनी न्यायालयाला दिली.अपिलकर्त्यांनी वैद्यकीय अभ्यासक्रमासाठीचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि शेवटी परीक्षामध्ये यश मिळविले.हे लक्षात घेऊन अपिलकर्त्यासाठी संविधान कलम १४२ अंतर्गत निर्णय दिला.हा निर्णय केवळ त्यांच्या पुरता मर्यादित आहे. तो इतर कोणालाही लागू होणार नाहीत.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची,शासनाची फसवणूक करुन या दोघांच्या कुटुंबातील सहा सदस्यांनी जातवैधता प्रमाणपत्रे मिळविली आहेत.असा दावा करीत ती प्रमाणपत्रे रद्द करण्याची मागणी केली आहे.आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था आता कोणता निर्णय घेतात याकडे राज्यातील आदिवासी समाजबांधवांचे लक्ष लागले आहे.

नांदेड जिल्ह्यात उमरी तालुक्यातील बोथी येथील विवेककुमार सायन्ना आडपोड याच्या कुटुंबातील रक्तनात्यात वडील सायन्ना नागनाथ आडपोड, आई रमाकांता भुमन्ना कचकलवार,मावसभाऊ पंडीत नारायण दोनकलवार या तिघांकडे 'मन्नेरवारलू' जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र आहेत.

दुसरे लातूर जिल्हयात शिरुर तालुक्यातील साकोळ येथील सचिन देवराज धोत्रे याच्या कुटुंबातील रक्तनात्यात वडील देवराज व्यंकटराव धोत्रे, भाऊ ऋषिकेश देवराज धोत्रे, बहीण शिल्पा देवराज धोत्रे यांच्याकडे 'कोळी महादेव' जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र आहेत.

> "या दोघांच्या रक्तनात्यातील सदस्यांनी जातपडताळणी समिती, शासनाची आणि राज्यघटनेची फसवणूक करुन जातवैधता प्रमाणपत्रे मिळविली आहे.त्यामुळे आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांनी या दोघांच्या रक्तनात्यातील सर्वांचे जातवैधता प्रमाणपत्र रद्द करावे.आणि अधिनियम २००० मधील तरतुदीनुसार कठोर कारवाई करावी"
>
> **- बाळकृष्ण मते राज्य उपाध्यक्ष, ट्रायबल फोरम.**

# छत्रपती महाराजस्व अभियान समाधान शिबीरास उस्फुर्त प्रतिसाद

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**



छत्रपती महाराजस्व अभियान – समाधान शिबीर अष्टापूर या ठिकाणी नुकतेच संपन्न झाले. शासनाच्या महसूल सेवा थेट जनतेच्या दारापर्यंत पोहोचल्या आहेत असे मत शिरुर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली आबा कटके यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाला लाभलेले मान्यवरांचे मार्गदर्शन आणि सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे सहकार्य यामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी सतीश राऊत, उपविभागीय अधिकारी डॉ. यशवंत माने, अप्पर तहसीलदार तृप्ती कोलते, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप, हवेली पंचायत समितीचे सभापती युवराज काकडे, गट विकास अधिकारी आशिष शेलार, तालुका कृषी अधिकारी अमित रनावरे, यशवंतचे संचालक शामराव कोतवाल, सरपंच पुष्पा कोतवाल, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समितीचे सदस्य मनोज चौधरी, ग्रामविकास अधिकारी, सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या आगमनानंतर कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. छत्रपतींच्या आदर्शांवर चालत जनतेची सेवा करण्याचा संकल्प यावेळी सर्वांनी व्यक्त केला. त्यानंतर महसूल विभागाच्या सेवांना अधिक सुलभ आणि आधुनिक बनवण्यासाठी महसूली सेवांच्या QR कोड वाचनालयाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. ही संकल्पना पुणे जिल्ह्यात प्रथमच राबविण्यात आली, ही अभिमानाची बाब आहे. या माध्यमातून नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा, अर्ज प्रक्रिया आणि आवश्यक माहिती मोबाईलद्वारे सहज उपलब्ध होणार आहे. या शिबिरामध्ये मान्यवरांनी नागरिकांच्या अडचणी प्रत्यक्ष ऐकून घेतल्या आणि त्यावर आवश्यक ते मार्गदर्शन केले. अनेक नागरिकांनी आपल्या समस्या मांडल्या आणि त्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी तत्परतेने प्रयत्न केले. या कार्यक्रमात संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी, तसेच बिबट्या हल्ल्यात बाधित लाभार्थी, तसेच जातीचे प्रमाणपत्र यांसारख्या विविध शासकीय योजनांचे लाभ मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान हेच या कार्यक्रमाचे खरे यश आहे. याचबरोबर महसूल विभागाकडून देण्यात येणाऱ्या १५ महत्त्वपूर्ण सेवांबाबत नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या सेवांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया, अर्ज कसा भरायचा आणि कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत याबाबत माहिती देण्यात आली. या शिबिराला आलेल्या सर्व गरजू नागरिकांचे अर्ज भरून स्वीकारण्यात आले आणि पुढील कार्यवाहीसाठी नोंद करण्यात आली. संपूर्ण कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये मंडळ अधिकारी गीताश्री काळे, अपर तहसील कार्यालयातील सर्व मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी आणि इतर कर्मचारी यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. त्यांनी प्रामाणिकपणे आणि मेहनतीने काम करत नागरिकांना योग्य मार्गदर्शन केले आणि शिबिर सुरळीत पार पडण्यासाठी मोठे योगदान दिले. त्यांच्या सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम अधिक प्रभावी आणि यशस्वी ठरला.

> तहसीलदार तृप्ती कोलते यांनी नागरिकांच्या मागणीनुसार परिसरातील रस्त्याच्या कामाबाबत प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. नागरिकांच्या समस्यांकडे संवेदनशीलतेने पाहून तत्काळ निर्णय घेण्याची ही सकारात्मक भूमिका निश्चितच कौतुकास्पद आहे. या कार्यक्रमाच्या यशामध्ये उपस्थित सर्व अधिकारी-कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घेणारे सर्व नागरिक यांचेही तितकेच महत्त्वाचे योगदान आहे. आपल्या सहभागामुळेच अशा शिबिरांना खरे यश मिळते आणि शासनाच्या सेवा अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचतात.